# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. प्रशासकीय सभा दि. ०६/१०/२०२२

### // गोषवारा //

विषय : राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडील "महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुलभूत सोई सुविधांचा विकास" योजने अंतर्गत निधि विकास करण्यासाठी मान्यता दिलेले सी. सी. टी. व्ही. संदर्भातील विकासकाम करण्यास व महानगरपालिकेचा २५% हिस्सा उपलब्ध करून देणेस मान्यता देणे.

संदर्भ : १) शासन निर्णय क्र. मनपा-२०२२/प्र.क्र.१४२(१८-अ)/न.वि.१६, दि. १०/०६/२०२२
२) क्र. ८१, दि. २१/०९/२०२२ अन्वये सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता

प्रकरण क्र. : ( ४९ )

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मिरा रोड (पूर्व) नयानगर पोलिस स्टेशन अंतर्गत सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे कामी मुलभूत सोई सुविधांचा विकास या योजने अंतर्गत रक्कम रू. २६० लक्ष इतका निधी वितरीत करण्यास अटी-शर्तीच्या अधिन राहून उपरोक्त दि. १०/०६/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आलेली आहे.

संदर्भिय शासन निर्णयानुसार कार्यान्वयन यंत्रणा महानगरपालिका आहे. त्यानुसार या विभागामार्फत उपरोक्त कामाकरीता नया नगर पोलिस स्टेशनचे अधिकारी यांचे सोबत स्थळपाहणी करून व गृह विभागाने यापूर्वी मंजुर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार (DPR) निश्चित करण्यात आलेली ठिकाणे यांची सांगड घालून सर्व्हेक्षण करून अंदाजपत्रक तयार करून त्यास सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेतलेली आहे.

सदर प्रकल्पा अंतर्गत शासनाचा ७५% हिस्सा व महानगरपालिकेचा २५% हिस्सा राहणार आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी रू. ६५ लक्ष मिरा भाईंदर महानगरपालिकेचा हिस्सा राहणार असून सदर खर्च महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये तरतूद करून करावा लागणार आहे. उर्वरीत रू. १९५ लक्ष निधी शासनाकडून प्राप्त होणार आहे. तरी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील तरतूदीतून रू. ६५ लक्ष खर्च करणेस सदरचे काम करणेस मान्यता देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि -१४, दि. २६/०८/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद व विशेषत: कलम ४५२ अ चा (१अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झालेले आहेत. सदर प्राप्त अधिकारात वरील नमुद प्रस्तावास मान्यता मिळणेस शिफारस आहे.

२९/९

(संजय शिंदे)
उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. प्रशासकीय सभा दि. ०६/१०/२०२२

## // ठराव //

विषय क्र ( ४९ ) :

**राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडील "महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुलभूत सोई सुविधांचा विकास" योजने अंतर्गत निधि विकास करण्यासाठी मान्यता दिलेले सी. सी. टी. व्ही. संदर्भातील विकासकाम करण्यास व महानगरपालिकेचा २५% हिस्सा उपलब्ध करून देणेस मान्यता देणे.**

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मिरा रोड (पूर्व) नयानगर पोलिस स्टेशन अंतर्गत सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे कामी मुलभूत सोई सुविधांचा विकास या योजने अंतर्गत रक्कम रू. २६० लक्ष इतका निधी वितरीत करण्यास अटी-शर्तींच्या अधिन राहून शासन निर्णय क्र. मनपा-२०२२/प्र.क्र.१४२(१८-अ)/न.वि.१६, दि. १०/०६/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आलेली आहे.

याकामी विभागामार्फत नया नगर पोलिस स्टेशनचे अधिकारी यांचे सोबत स्थळपाहणी करून व गृह विभागाने यापूर्वी मंजुर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार (DPR) निश्चित करण्यात आलेली ठिकाणे यांची सांगड घालून सर्व्हेक्षण करून अंदाजपत्रक तयार करून त्यास सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेतलेली आहे.

सदर प्रकल्पा अंतर्गत शासनाचा ७५% हिस्सा व महानगरपालिकेचा २५% हिस्सा राहणार आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी रू. ६५ लक्ष मिरा भाईंदर महानगरपालिकेचा हिस्सा राहणार असून सदर खर्च महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये तरतूद करून करावा लागणार आहे. उर्वरीत रू. १९५ लक्ष निधी शासनाकडून प्राप्त होणार आहे. तरी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील तरतूदीतून रू. ६५ लक्ष खर्च करणेस सदरचे काम करणेस मान्यता देणेस व कामाची अंदाजपत्रके प्रस्तावासह प्रशासकीय मान्यतेसाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि -१४, दि. २६/०८/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद व विशेषत: कलम ४५२ अ चा (१अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झालेले आहेत. वरील कामाच्या खर्चास प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ४० दि. ०६/१०/२०२२**

महाराष्ट्र राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडील "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास" योजने अंतर्गत निधी विकास करण्यासाठी मान्यता दिलेले विकास काम करण्यास व महानगरपालिकेचा २५% हिस्सा उपलब्ध करून देण्याच्या कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या १(अ) व १(ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि -१४, दि. २६/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करून प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरून खालील कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | रक्कम रूपये | शासन हिस्सा | मनपा हिस्सा |
|---|---|---|---|---|
| ०१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मिरा रोड (पूर्व) नयानगर पोलिस स्टेशन अंतर्गत सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे. (मुलभूत सोई सुविधांचा विकास) | रू. २६० लक्ष | रू. १९५ लक्ष | रू. ६५ लक्ष |

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पद्धतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## परिवहन उपक्रम
## // गोषवारा //

सभा दि. ०६/१०/२०२२

**प्रकरण क्र. ४२ :- 15 व्या वित्त आयोग "राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम" अंतर्गत अनुदानातून इलेक्ट्रीक बस खरेदी करणेबाबत.**

केंद्र शासनाच्या 15 व्या वित्त आयोगांर्तगत राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत सन 2020-21 व 2021-22 मधील प्राप्त अनुदानातून e-Bus खरेदी करणेसाठी रु.14.00 कोटी निधी उपलब्ध आहे. या निधीमधून 13.20 कोटी निधी Wet Lease Basis वर e-Bus खरेदी करणेसाठी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार 30 Midi e-Buses (Wet Lease Basis वर) खरेदी करीता Gross cost Contract (GCC तत्वावर) बस ऑपरेटर नियुक्त करणेस प्रशासकीय ठराव क्र.14 दि.08/09/2022 अन्वये मंजूरी दिलेली आहे.

उक्तप्रमाणे प्राप्त अनुदानातील e-Bus साठी उपलब्ध करून दिलेल्या निधीमधून e-Bus (Wet Lease Basis वर) खरेदी Gross cost Contract (GCC तत्वावर) बस ऑपरेटर नियुक्त करण्यासाठी निविदा प्रक्रिया प्रस्तावित करावयाची आहे. सदरची निविदा प्रक्रिया करून बसेस ताब्यात येण्यासाठी किमान 6 महिन्याचा कालावधी लागेल. सद्याचा उपलब्ध निधी लेखा विभागामार्फत बँकेमध्ये ठेव स्वरूपात गुतंवणुक केलेला आहे. तसेच सन 2022-23 मध्ये देखील अनुदान स्वरूपात रु.11.26 कोटी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे सन 2022-23 मधील काही निधी e-Bus खरेदीसाठी वापरता येईल.

सबब, e-Bus (Wet Lease Basis वर) खरेदीसाठी निविदा प्रक्रिया करताना सन 2022-23 मधील प्राप्त अनुदानातून उपलब्ध निधी विचारात घेऊन निविदा प्रक्रिया करणे योग्य होईल. जेणे करून सन 2022-23 मध्ये उपलब्ध निधीतून e-Bus करिता पुन्हा निविदा प्रक्रिया करण्याची आवश्यकता राहणार नाही.

त्यामुळे सन 2022-23 मधील अपेक्षित अनुदानातून उपलब्ध होणारा निधी विचारात घेऊन व शहराची सार्वजनिक वाहतूकीची आवश्यकता विचारात घेऊन खालीलप्रमाणे e-Bus खरेदी करणे योग्य होईल.

| अ.क्र | बसेसचे स्वरूप | आवश्यक संख्या | e-Bus करीता Subsidy साठी आवश्यक निधी | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | 12 मीटर Non AC Buses | 15 | रु.55 लक्ष प्र.बस | रु.8.25 कोटी |
| 2 | 12 मीटर AC Buses | 10 | रु.55 लक्ष प्र.बस | रु.5.50 कोटी |
| 3 | 9 मीटर Non AC Buses | 20 | रु.45 लक्ष प्र.बस | रु.9.00 कोटी |
| एकुण | | 45 | - | **रु.22.75 कोटी** |
| 2020-21/ 2021-22 मधील उपलब्ध निधी | | | | रु.13.20 कोटी |
| आवश्यक वाढीव निधी | | | | **रु.9.55 कोटी** |

तरी, सन 2022-23 व त्यापुढील आर्थिक वर्षाच्या अपेक्षित अनुदानातून e-Bus साठी वाढीव निधी उपलब्ध करून देणेस व उक्तप्रमाणे एकूण 45 e-Bus साठी Wet Lease Basis वर (Gross Cross Contract तत्वावर) (GCC) निविदा प्रक्रिया करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(अनिकेत मानोरकर)
अति.आयुक्त तथा
परिवहन व्यवस्थापक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## परिवहन उपक्रम
## प्रशासकीय ठराव दि.०६/१०/२०२२

**प्रकरण क्र.४२ :- 15 व्या वित्त आयोग "राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम" अंतर्गत अनुदानातून इलेक्ट्रीक बस खरेदी करणेबाबत.**

ठराव :-४१

केंद्र शासनाच्या 15 व्या वित्त आयोगांतंगत राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत सन 2020-21 व 2021-22 मधील प्राप्त अनुदानातून e-Bus खरेदी करणेसाठी रु.14.00 कोटी निधी उपलब्ध आहे. या निधीमधून 13.20 कोटी निधी Wet Lease Basis वर e-Bus खरेदी करणेसाठी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार 30 Midi e-Buses (Wet Lease Basis वर) खरेदी करीता Gross cost Contract (GCC तत्वावर) बस ऑपरेटर नियुक्त करणेस प्रशासकीय ठराव क्र.14 दि.08/09/2022 अन्वये मंजूरी दिलेली आहे.

उक्तप्रमाणे प्राप्त अनुदानातील e-Bus साठी उपलब्ध करून दिलेल्या निधीमधून e-Bus (Wet Lease Basis वर) खरेदी Gross cost Contract (GCC तत्वावर) बस ऑपरेटर नियुक्त करण्यासाठी निविदा प्रक्रिया प्रस्तावित करावयाची आहे. सदरची निविदा प्रक्रिया करून बसेस ताब्यात येण्यासाठी किमान 6 महिन्याचा कालावधी लागेल. सद्याचा उपलब्ध निधी लेखा विभागामार्फत बँकेमध्ये ठेव स्वरूपात गुतंवणुक केलेला आहे. तसेच सन 2022-23 मध्ये देखील अनुदान स्वरूपात रु.11.26 कोटी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे सन 2022-23 मधील काही निधी e-Bus खरेदीसाठी वापरता येईल.

सबब, e-Bus (Wet Lease Basis वर) खरेदीसाठी निविदा प्रक्रिया करताना सन 2022-23 मधील प्राप्त अनुदानातून उपलब्ध निधी विचारात घेऊन निविदा प्रक्रिया करणे योग्य होईल. जेणे करून सन 2022-23 मध्ये उपलब्ध निधीतून e-Bus करिता पुन्हा निविदा प्रक्रिया करण्याची आवश्यकता राहणार नाही.

त्यामुळे सन 2022-23 मधील अपेक्षित अनुदानातून उपलब्ध होणारा निधी विचारात घेऊन व शहराची सार्वजनिक वाहतूकीची आवश्यकता विचारात घेऊन खालीलप्रमाणे e-Bus खरेदी करणे योग्य होईल.

| अ.क्र | बसेसचे स्वरूप | आवश्यक संख्या | e-Bus करीता Subsidy साठी आवश्यक निधी | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | 12 मीटर Non AC Buses | 15 | रु.55 लक्ष प्र.बस | रु.8.25 कोटी |
| 2 | 12 मीटर AC Buses | 10 | रु.55 लक्ष प्र.बस | रु.5.50 कोटी |
| 3 | 9 मीटर Non AC Buses | 20 | रु.45 लक्ष प्र.बस | रु.9.00 कोटी |
| **एकुण** | | **45** | - | **रु.22.75 कोटी** |
| 2020-21/ 2021-22 मधील उपलब्ध निधी | | | | रु.13.20 कोटी |
| आवश्यक वाढीव निधी | | | | **रु.9.55 कोटी** |

तरी, सन 2022-23 व त्यापुढील आर्थिक वर्षाच्या अपेक्षित अनुदानातून e-Bus साठी वाढीव निधी उपलब्ध करून देणेस व उक्तप्रमाणे एकूण 45 e-Bus साठी Wet Lease Basis वर (Gross Cross Contract तत्वावर) (GCC) निविदा प्रक्रिया करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(दिलीप ढोले)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**// गोषवारा //**

सभा दि. 06/10/2022

प्रकरण क्रमांक ( ४3 ) :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे.नवघर आरक्षण क्र.299 (उद्यान) या जागेत "धर्मविर छत्रपती संभाजी महाराज" यांचा अश्वारुढ पुतळा व स्मारक बांधणे कामास मान्यता देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात "धर्मविर छत्रपती संभाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा व स्मारक बांधणे" बाबत मागणी होत असून सदर पुतळा व स्मारक बांधण्यासाठी जागा निश्चीत करुन शासनाकडील पुतळा धोरणानुसार मार्गदर्शक तत्वानुसार आवश्यक शासकीय परवानग्या घेऊन प्रस्ताव अंतिम परवानगीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती पुढे सादर करावयाचा आहे. मिरारोड (पुर्व) मौजे.नवघर येथे आरक्षण क्र.299 (उद्यान) या ठिकाणी जागा निश्चित करुन सदर जागा बंदिस्त करुन सदर. जागेत अश्वारुढ पुतळा बसविणे करीता शासनाच्या धोरणानुसार आवश्यक कार्यवाही व पत्रव्यवहार करुन मान्यता घ्यावयाच्या आहेत. तरी सदर पुतळा तयार करुन बसविणे कामी आवश्यक कार्यवाही करण्यास, मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**प्र.शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा.आयुक्त यांच्या मान्येतेने.**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक 06 ऑक्टोंबर 2022 रोजी सकाळी 11.00 वाजता.

प्रकरण क्र. (43) :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे-नवघर आरक्षण क्र.299 (उद्यान) या जागेत "धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज" यांचा अश्वारुढ पुतळा व स्मारक बांधणे कामास मान्यता देणे.

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात "धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा व स्मारक बांधणे" बाबत मागणी होत असुन सदर पुतळा व स्मारक बांधण्यासाठी जागा निश्चित करुन शासनाकडील पुतळा धोरणानुसार मार्गदर्शक तत्वानुसार आवश्यक शासकीय परवानग्या घेऊन प्रस्ताव अंतिम परवानगीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती पुढे सादर करावयाचा आहे. मिरारोड (पुर्व) मौजे नवघर येथे आरक्षण क्र.299 (उद्यान) या ठिकाणी जागा निश्चित करुन सदर जागा बंदिस्त करुन सदर जागेत अश्वारुढ पुतळा बसविणे करीता शासनाच्या धोरणानुसार आवश्यक कार्यवाही व पत्रव्यवहार करुन मान्यता घ्यावयाच्या आहेत. तरी सदर पुतळा तयार करुन बसविणे कामी आवश्यक कार्यवाही करण्यास, मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ४२ दिनांक 06/10/2022**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे-नवघर आरक्षण क्र.299 (उद्यान) या जागेत "धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज" यांचा अश्वारुढ पुतळा व स्मारक बांधणे कामास कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीआर 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करून प्रशासनाने सादर केल्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे नवघर आरक्षण क्र.299 (उद्यान) येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा व स्मारक बांधण्यासाठी जागा निश्चित करण्यात येत असुन सदर पुतळा बसविणेसाठी शासनाच्या धोरणानुसार सर्व आवश्यक परवानग्या, मान्यता घेणेसाठी कार्यवाही करणेस तसेच येणाऱ्या खर्चास अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

PC-6/22-23/DK/SG - 11

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## [illegible] सभा दि. ६/१०/2022

## // गोषवारा //

**<u>प्रकरण क्र.</u> (४३) :** मिरा-भाईंदर क्षेत्रातील मनोरी - गोराई - उत्तन अधिसुचित क्षेत्रसाठी विद्यमान स्थिती दर्शक नकाशा हा भौगोलिक माहीती प्रणाली या संगणक प्रणालीवर तयार करणे बाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातली मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या विशेष नियोजन प्राधिकरणाकडे असलेल्या 8 गावांपैकी 6 गावे (उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोरवा) ज्यांचे एकत्रित क्षेत्र 23.61 चौ.कि.मी. आहे. सदर गावे वगळुन मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना सुधारीत करणे कामी शासनामार्फत नामनिर्देशित अधिकारी म्हणुन सहाय्यक संचालक, नगर रचना ठाणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अनुषंगाने विकास योजना सुधारीत करणेचे काम प्रगती पथावर आहे.

मनोरी-गोराई-उत्तन या अधिसुचित क्षेत्राकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सन 2011-2022 या कालावधीसाठी विकास योजना तयार करण्यात आली असुन शासन निर्णय क्र. टि.पी.बी. 4312 / 323 / सी.आर. 23 / 2013 / नवि-1 अन्वये दि. 13 मे 2013 रोजी मंजुरी देण्यात आली. मनोरी - गोराई - उत्तन या अधिसुचित क्षेत्रातील एकुण गावांचे क्षेत्र 44.40 चौ.कि.मी. आहे. अधिसुचित क्षेत्रातील 8 गावांपैकी 6 गावांकरीता स्थानिक प्राधिकरण मिरा-भाईंदर महानगरपालिका होते व नियोजन प्राधिकरण हे मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण होते परंतु दि. 16 मार्च 2017 रोजी महाराष्ट्र शासन निर्णय क्र. टि.पी.बी 4316 / प्र. क्र. 247/2016/नवि-11 अन्वये गोराई-मनोरी-उत्तन या अधिसुचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन केलेली नियुक्ती रद्द केली व सदर विकास योजनेची अंमलबजावणी करण्याचे कर्तव्य मिरा-भाईंदर महानगर पालिकेचे असल्याचे नमुद करण्यात आलेले आहे.

सदर विकास योजनेची अंमलबजावणी करणे, स्थानिक प्रशासन म्हणुन तिथले सर्व प्रकल्प राबविणे, नियोजन करणे हे महानगरपालिकेचे प्रथम कर्तव्य असल्यामुळे या 6 गावांसाठी भौगोलिक माहीती प्रणाली या संगणक प्रणालीचा वापर करुन क्षेत्रात सोयी सुविधा पुरविणे, नियोजन करणे व विकास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी सद्यस्थिती म्हणजेच विद्यमान स्थिती दर्शक नकाशा जो की, विकास योजनेकरीता तयार करण्यात येणाऱ्या विद्यमान जमीन वापर नकाशाच्या धर्तीवर तयार करणे गरजेचे आहे. विद्यमान स्थिती दर्शक नकाशा हा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्याशी सुसंगत असुन विद्यमान जमिन वापर (ELU) नकाशासारखे त्याला कुठलेही वैधानिक अधिष्ठान नाही.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# प्रशासकीय ठराव क्र. ४३ दि. ६/१०/2022

**प्रकरण क्र. ४४** : मिरा-भाईंदर क्षेत्रातील मनोरी - गोराई - उत्तन अधिसुचित क्षेत्रसाठी विद्यमान स्थिती दर्शक नकाशा हा भौगोलिक माहीती प्रणाली या संगणक प्रणालीवर तयार करणे बाबत.

**वाचले** :- सहायक संचालक, नगररचना, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेला गोषवारा.

## // कार्यालयीन प्रस्तावना //

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातली मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या विशेष नियोजन प्राधिकरणाकडे असलेल्या 8 गावांपैकी 6 गावे (उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोरवा) ज्यांचे एकत्रित क्षेत्र 23.61 चौ.कि.मी. आहे. सदर गावे वगळुन मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना सुधारीत करणे कामी शासनामार्फत नामनिर्देशित अधिकारी म्हणुन सहाय्यक संचालक, नगर रचना ठाणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अनुषंगाने विकास योजना सुधारीत करणेचे काम प्रगती पथावर आहे.

मनोरी-गोराई-उत्तन या अधिसुचित क्षेत्राकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सन 2011-2022 या कालावधीसाठी विकास योजना तयार करण्यात आली असुन शासन निर्णय क्र. टि.पी.बी. 4312 / 323 / सी.आर. 23 / 2013 / नवि-1 अन्वये दि. 13 मे 2013 रोजी मंजुरी देण्यात आली. मनोरी - गोराई - उत्तन या अधिसुचित क्षेत्रातील एकुण गावांचे क्षेत्र 44.40 चौ.कि.मी. आहे. अधिसुचित क्षेत्रातील 8 गावांपैकी 6 गावांकरीता स्थानिक प्राधिकरण मिरा-भाईंदर महानगरपालिका होते व नियोजन प्राधिकरण हे मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण होते परंतु दि. 16 मार्च 2017 रोजी महाराष्ट्र शासन निर्णय क्र. टि.पी.बी 4316 / प्र. क्र. 247/2016/नवि-11 अन्वये गोराई-मनोरी-उत्तन या अधिसुचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन केलेली नियुक्ती रद्द केली व सदर विकास योजनेची अंमलबजावणी करण्याचे कर्तव्य मिरा-भाईंदर महानगर पालिकेचे असल्याचे नमुद करण्यात आलेले आहे.

सदर विकास योजनेची अंमलबजावणी करणे, स्थानिक प्रशासन म्हणुन तिथले सर्व प्रकल्प राबविणे, नियोजन करणे हे महानगरपालिकेचे प्रथम कर्तव्य असल्यामुळे या 6 गावांसाठी भौगोलिक माहीती प्रणाली या संगणक प्रणालीचा वापर करुन क्षेत्रात सोयी सुविधा पुरविणे, नियोजन करणे व विकास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी सद्यस्थिती म्हणजेच विद्यमान स्थिती दर्शक नकाशा जो की, विकास योजनेकरीता तयार करण्यात येणाऱ्या विद्यमान जमीन वापर नकाशाच्या

धर्तीवर तयार करणे गरजेचे आहे. विद्यमान स्थिती दर्शक नकाशा हा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्याशी सुसंगत असुन विद्यमान जमिन वापर (ELU) नकाशासारखे त्याला कुठलेही वैधानिक अधिष्ठान नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मुळ क्षेत्राकरीता विकास योजना सुधारीत करणेच्या कामासाठी नियुक्त सल्लागारामार्फत 6 गावांकरीताचा विद्यमान स्थिती दर्शक नकाशा तयार करणेसाठी मा. आयुक्त यांचे मार्फत दि. 19/04/2022 च्या पत्रान्वये नामनिर्देशित अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगररचना, ठाणे यांना विनंती केली होती व त्याकरीताचा होणाऱ्या खर्चाची पुर्तता ही महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल असे कळविण्यात आले होते. सदर पत्रास अनुसरुन सहाय्यक संचालक नगररचना, ठाणे यांच्या मार्फत दि. 06/05/2022 रोजीच्या पत्राद्वारे मिरा-भाईंदर महानगरपालिकेसाठीची विकास योजना तयार करणेकामी सल्लागार नियुक्ती संचालक, नगररचना महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत तयार केलेल्या कोकण विभागासाठीच्या खाजगी संस्थाच्या निवडसुची मधुन नेमणुक केलेल्या संस्थेकडुन मंजुर दर रु.6,127/- प्रति हे. प्रमाणे केलेली आहे. विकास योजना तयार करणेसाठी लागु करण्यात आलेल्या मानक पद्धतीनुसार व दि. 26/01/2019 च्या शासन निर्णयान्वये विद्यमान जमीन वापर नकाशा करीता एकुण खर्चाच्या 40% खर्च अपेक्षित आहे. विद्यमान स्थिती दर्शक नकाशा हा विद्यमान जमीन वापर नकाशाशी सुसंगत असुन त्याकरीता मंजुर दराच्या 40% दर म्हणजेच रु. 2,451/- प्रति हे. खर्चानुसार 6 गावांच्या रु. 2,361/- हे. क्षेत्राकरीता रु. 65,22,111/- (अक्षरी रु. पासष्ट लाख बावीस हजार, एकशे अकरा रुपये मात्र) इतका खर्च अपेक्षित धरता येऊ शकेल. सदरची कार्यवाही ही शासनाने माजी नामनिर्देशित अधिकारी म्हणुन केलेल्या नियुक्ती कार्यकक्षेबाहेरील असल्याने सदरचे काम हे महानगरपालिकेमार्फत करावयाचे झाल्यास त्यास शासनाची पुर्वअनुमती घ्यावी लागणार आहे.

तथापी, उपरोक्त परिच्छेदात नमुद वस्तुस्थिती, निवड केलेली संस्था तसेच शासनाने मंजुर केलेले दर विचारात घेता उक्त संस्थेची महानगरपालिके तर्फे थेट नियुक्ती करुन हे काम सहाय्यक संचालक, नगररचना विभाग मि.भा.मनपा यांचे अधिपत्याखाली करुन घेता येईल असे मत असल्याचे कळविले आहे.

त्याअनुषंगाने 6 गावांकरीता (उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोरवा) ज्यांचे एकत्रित क्षेत्र 26.61 चौ.कि.मी. आहे, त्यासाठीचा विद्यमान स्थिती दर्शक नकाशा तयार करणेसाठी मुळ महानगरपालिका क्षेत्राकरीताची विकास योजना सुधारीत करणे कामी नियुक्त सल्लागारांची मे. टेकॉम अर्बन मॅनेजमेन्ट कन्स्लटंन्ट्स ॲण्ड सर्विस प्रोव्हाईड्स ठाणे यांची नियुक्ती करणे उचित होईल.

सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73 (ड) नुसार 6 गावांकरीता (उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोरवा) विद्यमान स्थिती दर्शक नकाशा तयार करणे कामी मे. टेकॉम अर्बन मॅनेजमेन्ट कन्स्लटंन्ट्स ॲण्ड सर्विस प्रोव्हाईड्स यांची प्रति हे. रु. 2,451/- दराने नियुक्ती करणेस व त्याकरीता येणारा एकूण रु. 65,22,111/- (अक्षरी रु. पासष्ट लाख बावीस हजार,

एकशे अकरा रुपये मात्र) खर्चास मा. प्रशासक यांची मंजुरी मिळणेस विनंती. असा प्रस्ताव सादर केला आहे.

## प्रशासकीय ठराव क्र. ४३ दि.०६/१०/2022

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत 6 गावांकरीताचा विद्यमान स्थिती दर्शक नकाशा तयार करणे कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452(अ) च्या (1अ) व (1ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एम.सी.ओ.2020/प्रक्र.71(भाग-1)/नवि-14, दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार श्री. दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभेचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत 6 गावांकरीता (उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोरवा) विद्यमान स्थितीदर्शक नकाशा तयार करणेकामी मे. टेक्कॉम अर्बन मॅनेजमेंन्ट कन्स्ल्टंन्ट्स ॲण्ड सर्विस प्रोव्हायडर्स यांची रु.2,451/- प्रति हेक्टर दराने नियुक्ती करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकूण रु. 65,22,111/- (अक्षरी रु. पासष्ट लाख बावीस हजार, एकशे अकरा रुपये मात्र) इतक्या खर्चास मान्यता देत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पद्धतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.0८/१0/2022

## // गोषवारा //

<u>प्रकरण क्र.</u> (४५) : मौजे घोडबंदर येथील स.क्र.233, क्षेत्रफळ 8320.00 चौ.मी. आणि मौजे नवघर येथील स.क्र. (जुना) 144 (नविन) 441, क्षेत्र 8307 सदर भुखंड "शैक्षणिक कामाकरीता" आरक्षीत करणेच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये सादर फेरबदल प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

1) <u>मौजे घोडबंदर, स.क्र. 233</u> -

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.

उक्त विकास योजनानुसार मौजे घोडबंदर, स.क्र. 233 हि जागा 18.00 मी. रुंद विकास योजना रस्ता, भागशः आ.क्र. 288 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) व भागशः आ.क्र. 289 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान) अन्वये बाधीत होत असून उर्वरीत जागा रहिवास विभागात सामाविष्ठ आहे तसेच सदरची जागा भागशः सी.आर.झेड. अन्वये बाधीत होत आहे.

मौजे घोडबंदर, स.क्र. 233 या जागेची मालकी सरकारी आकारी पडीक याप्रमाणे आहे व 7/12 उता-यानुसार उक्त जागेचे क्षेत्र 41780.00 चौ.मी. इतके आहे व प्रत्यक्ष जागेवर 37818.00 चौ.मी. क्षेत्र उपलब्ध होत आहे.

मौजे घोडबंदर, स.क्र. 233 ही जागा भागशः CRZ-III ने बाधीत होत असून सि.आर.झेड. ने बाधीत क्षेत्र व उर्वरीत रहिवास विभागातील क्षेत्राचा तपशील खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| भूखंड क्षेत्र | - | 13775.65 चौ.मी. |
| 18.0 मी. रुंद विकास योजना रस्ता | - | 1796.49 चौ.मी. |
| एकूण क्षेत्र | - | 15662.14 चौ.मी. |
| सि.आर.झेड. ने बाधीत क्षेत्र | - | 22155.00 चौ.मी. |
| एकूण क्षेत्र | - | 37817.14 चौ.मी. |

वरिल भुखंडा पैकी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे पत्र क्र. महसूल/क-1/टे-1/एलएनडी/आगाऊ ताबा/एसआर-1 /2011, दि.09/03/2011 नुसार 4353.37 चौ.मी. क्षेत्राचा आगाऊ ताबा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, ठाणे यांना देण्याचे आदेश दिलेले आहेत.

या जागेत शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने न्यायालयीन वापराच्या इमारत बांधणीचा प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केलेला असता, मिरा भाईंदर महानगरपालिकेने पत्र क्र. मिभा/मनपा/नर/1047/2014-15, दि.11/07/2014 अन्वये नकाशा मंजूरीसह बांधकाम प्रारंभपत्र दिलेले आहे.

**2) <u>मौजे नवघर, स.क्र. 441 (जुना), 114 (नविन)</u> -**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे नवघर, स.क्र. 441 (जुना), 114 (नविन) हि जागा भागशः 18.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत असून उर्वरीत जागा रहिवास विभागात सामाविष्ट आहे. 18.00 मी. रुंद विकास योजना रस्ता जागेवर विकसीत झालेला आहे. प्रस्तावित जागा मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी प्राप्त सन 2005 च्या CZMP नकाशानुसार सी.आर.झेड. ने बाधीत होत नाही.

प्रस्तावित जागा महसूल अभिलेखी 7/12 उता-यावर गुरचरण (सरकारी) अशी नोंद आहे. जागेचे क्षेत्र 1.18.00 हे.आर (11800 चौ.मी.) आहे.

वरीलप्रमाणे मा.आ.श्री. प्रताप सरनाईक यांनी उपरोक्त जागा "शैक्षणिक प्रयोजनासाठी" मिळणेबाबत यापूर्वी दि.24/08/2022 रोजीच्यां पत्रान्वये विनंती केलेली आहे. सदर पत्रानुसार मागणी केलेल्या जागेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मौजे | स.क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| 1 | घोडबंदर | 233 | 8320 |
| 2 | नवघर | 441 (जुना) 114 (नविन) | 8307 |

वरील प्रयोजनाच्या अनुषंगाने उपरोक्त जागा "शैक्षणिक आरक्षण" या कारणासाठी आरक्षित करणेकरीता दि.06/09/2022 रोजीच्या पत्रान्वये नियुक्त अधिकारी मिरा भाईंदर शहर विकास योजना (सु.) तथा सहायक संचालक, ठाणे शाखा यांस पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

मा.आ.श्री. प्रताप सरनाईक यांच्या दि.24/08/2022 रोजीचे पत्र तसेच उपरोक्त जागेतील वाढती लोकसंख्या पहाता सदर जागेत भविष्यात शैक्षणिक संस्थांची गरज भासणार आहे. सबब मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर येथील स.क्र.233, क्षेत्रफळ 8320.00 चौ.मी. आणि मौजे नवघर येथील स.क्र. (जुना) 144 (नविन) 441, क्षेत्र 8307 हा भुखंड "शैक्षणिक प्रयोजनाकरीता" आरक्षित करणेच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये फेरबदलाच्या कार्यवाहीस मा. प्रशासक यांची मंजुरी मिळणेकरीता प्रस्ताव सविनय सादर करण्यात येत आहे. (या सोबत प्रस्तावीत फेरबदल दर्शविणारा विकास योजना भाग नकाशा)

**(मा. आयुक्त तथा प्रशासक सो., यांचे मान्यतेने.)**

**( हे. रा. ठाकूर )**
**सहाय्यक संचालक, नगररचना**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि 04/10/2022 
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद प्रशासकीय
रजिस्टर क्र. 49 वर्ष :- 2022-23

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## प्रशासकीय ठराव क्र. ४४ दि. ०६/१० /2022

---

**प्रकरण क्र. ४५ :- मौजे घोडबंदर येथील स.क्र.233, क्षेत्रफळ 8320.00 चौ.मी. आणि मौजे नवघर येथील स.क्र. (जुना) 144 (नविन) 441, क्षेत्र 8307 सदर भुखंड "शैक्षणिक कामाकरीता" आरक्षीत करणेच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये सादर फेरबदल प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.**

**// कार्यालयीन प्रस्तावना //**

**1) मौजे घोडबंदर, स.क्र. 233** -

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.

उक्त विकास योजनानुसार मौजे घोडबंदर, स.क्र. 233 हि जागा 18.00 मी. रुंद विकास योजना रस्ता, भागशः आ.क्र. 288 (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) व भागशः आ.क्र. 289 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान) अन्वये बाधीत होत असून उर्वरीत जागा रहिवास विभागात सामाविष्ठ आहे तसेच सदरची जागा भागशः सी.आर.झेड. अन्वये बाधीत होत आहे.

मौजे घोडबंदर, स.क्र. 233 या जागेची मालकी सरकारी आकारी पडीक याप्रमाणे आहे व 7/12 उता-यानुसार उक्त जागेचे क्षेत्र 41780.00 चौ.मी. इतके आहे व प्रत्यक्ष जागेवर 37818.00 चौ.मी. क्षेत्र उपलब्ध होत आहे.

मौजे घोडबंदर, स.क्र. 233 ही जागा भागशः CRZ-III ने बाधीत होत असून सि.आर.झेड. ने बाधीत क्षेत्र व उर्वरीत रहिवास विभागातील क्षेत्राचा तपशील खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| भूखंड क्षेत्र | - | 13775.65 चौ.मी. |
| 18.0 मी. रुंद विकास योजना रस्ता | - | 1796.49 चौ.मी. |
| एकूण क्षेत्र | - | 15662.14 चौ.मी. |
| सि.आर.झेड. ने बाधीत क्षेत्र | - | 22155.00 चौ.मी. |
| एकूण क्षेत्र | - | 37817.14 चौ.मी. |

वरिल भुखंडा पैकी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे पत्र क्र. महसूल/क-1/टे-1/एलएनडी/आगाऊ ताबा/एसआर-1 /2011, दि.09/03/2011 नुसार 4353.37 चौ.मी. क्षेत्राचा आगाऊ ताबा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, ठाणे यांना देण्याचे आदेश दिलेले आहेत.

या जागेत शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने न्यायालयीन वापराच्या इमारत बांधणीचा प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केलेला असता, मिरा भाईंदर महानगरपालिकेने पत्र क्र. मिभा/मनपा/नर/1047/2014-15, दि.11/07/2014 अन्वये नकाशा मंजूरीसह बांधकाम प्रारंभपत्र दिलेले आहे.

**2) <u>मौजे नवघर, स.क्र. 441 (जुना), 114 (नविन)</u> -**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे नवघर, स.क्र. 441 (जुना), 114 (नविन) हि जागा भागशः 18.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत असून उर्वरीत जागा रहिवास विभागात सामाविष्ट आहे. 18.00 मी. रुंद विकास योजना रस्ता जागेवर विकसीत झालेला आहे. प्रस्तावित जागा मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी प्राप्त सन 2005 च्या CZMP नकाशानुसार सी.आर.झेड. ने बाधीत होत नाही.

प्रस्तावित जागा महसूल अभिलेखी 7/12 उता-यावर गुरचरण (सरकारी) अशी नोंद आहे. जागेचे क्षेत्र 1.18.00 हे.आर (11800 चौ.मी.) आहे.

वरीलप्रमाणे मा.आ.श्री. प्रताप सरनाईक यांनी उपरोक्त जागा "शैक्षणिक प्रयोजनासाठी" मिळणेबाबत यापूर्वी दि.24/08/2022 रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे. सदर पत्रानुसार मागणी केलेल्या जागेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मौजे | स.क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| 1 | घोडबंदर | 233 | 8320 |
| 2 | नवघर | 441 (जुना) 114 (नविन) | 8307 |

वरील प्रयोजनाच्या अनुषंगाने उपरोक्त जागा "शैक्षणिक आरक्षण" या कारणासाठी आरक्षित करणेकरीता दि.06/09/2022 रोजीच्या पत्रान्वये नियुक्त अधिकारी मिरा भाईंदर शहर विकास योजना (सु.) तथा सहायक संचालक, ठाणे शाखा यांस पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

मा.आ.श्री. प्रताप सरनाईक यांच्या दि.24/08/2022 रोजीचे पत्र तसेच उपरोक्त जागेतील वाढती लोकसंख्या पहाता सदर जागेत भविष्यात शैक्षणिक संस्थांची गरज भासणार आहे. सबब मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर येथील स.क्र.233, क्षेत्रफळ 8320.00 चौ.मी. आणि मौजे नवघर येथील स.क्र. (जुना) 144 (नविन) 441, क्षेत्र 8307 हा भुखंड "शैक्षणिक प्रयोजनाकरीता" आरक्षित करणेच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये फेरबदलाच्या कार्यवाहीस मा. प्रशासक यांची मंजुरी मिळणेकरीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. (या सोबत प्रस्तावीत फेरबदल दर्शविणारा विकास योजना भाग नकाशा)

# प्रशासकीय ठराव क्र. ४४ दि. ०६/१० /2022

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर येथील स.क्र.233, क्षेत्रफळ 8320.00 चौ.मी. आणि मौजे नवघर येथील स.क्र. (जुना) 144 (नविन) 441, क्षेत्र 8307 हा भुखंड महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये "शैक्षणिक प्रयोजनाकरीता" आरक्षित करणेच्या अनुषंगाने सादर फेरबदल प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452(अ) च्या (1अ) व (1ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एम.सी.ओ.2020/प्रक्र.71(भाग-1)/नवि-14, दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार श्री. दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभेचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरून मौजे घोडबंदर येथील स.क्र.233, क्षेत्रफळ 8320.00 चौ.मी. आणि मौजे नवघर येथील स.क्र. (जुना) 144 (नविन) 441, क्षेत्र 8307 हा भुखंड महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये "शैक्षणिक प्रयोजनाकरीता" आरक्षित करणेच्या अनुषंगाने सादर फेरबदल प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. (सोबतच्या प्रस्तावीत फेरबदल विकास योजना भाग नकाशानुसार)

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पद्धतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०६/१०/2022

## // गोषवारा //

<u>प्रकरण क्र.</u> (४६) : <u>भूसंपादन - मिरा- भाईंदर महानगरपालिका</u>,
मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुरविकास योजनेमधील मौजे-चेणे येथील सर्व्हे क्रमांक-2, 90, 91 व 148 या जमिनीमधील 7498.00 चौमी क्षेत्र **"नियोजीत 18.00 मी.रुंद रस्ता"** या सार्वजनिक प्रयोजनाकरीता "भूमि संपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013" (नवीन भूसंपादन अधिनियम-2013) अन्वये विकसित करणेकामी संपादन करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे-चेणे येथील विकास योजनेतील 12.00 मी. विकास योजना रस्त्यास नव्याने 18.00 मी. रुंदीकरण करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमचे कलम 37(1) मंजुरीनुसार मिळणेस शासनाकडे प्रस्ताव सादर केला असता सदर प्रस्तावास शासन निर्णय क्रमांक - टिपीएस-1220/786/प्रक्र.73/20/नवि-20 दि. 18 जानेवारी 2022 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(2) खालील तरतूदींनुसार शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे-चेणे येथील स.क्र. 2, 90, 91 व 148 या जमिनी 18.00 मी. रुंद रस्त्याने बाधीत होत असून सदर जमिनींचे 18.00 मी. रुंद रस्त्यासाठी" खाजगी वाटाघाटीने अथवा भूमि संपादन अधिनियमानुसार संपादन करुन ताब्यात घेणेबाबत संबंधितांस कळविण्यात आले होते. तथापि श्रीम. नेत्रा अजित विजयकर यांनी विषयांकित जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 व भूमि संपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013(नवीन भूसंपादन अधिनियम-2013) या अधिनियमानुसार सदर जमिनींचे भूसंपादन करणेबाबत श्रीम. नेत्रा अजित विजयकर, श्रीम. वरुणा श्रीकांत तांबे व श्रीम. अनिता रघुनाथ म्हापसेकर यांच्या एकत्रीत दि.08/06/2022 रोजीच्या विनंती अर्जाद्वारे लेखी विनंती केलेली आहे.

विषयांकित मौजे-चेणे येथील सर्व्हे क्र. 2, 90, 91 व 148 या जमिनींचे 7/12 उताऱ्यावरील भोगवटादार व सर्व्हे क्रमांक निहाय क्षेत्राबाबतची माहिती आणि संपादन करावयाच्या क्षेत्राची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | भोगवटादाराचे नाव | 7/12 उताऱ्या वरील क्षेत्र (चौ.मी.) | 18.00 मी. रुंद रस्त्याचे संपादन करावयाचे क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | श्रीम. नेत्रा अजित विजयकर | 7700 | 3085 |
| 2 | 90 | श्रीम. नेत्रा अजित विजयकर | 6880 | 2273 |
| 3 | 91 | श्रीम. नेत्रा अजित विजयकर | 26140 | 1130 |
| 4 | 148 | श्रीम.नेत्रा अजित विजयकर<br>श्रीम. वरुणा श्रीकांत तांबे<br>श्रीम.अनिता रघुनाथ म्हापसेकर | 3240 | 510 |
| | | | एकूण | 7498 चौ.मी. |

तथापि श्रीम. नेत्रा विजयकर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचीका क्र. 4447/2022 अन्वये याचीका दाखल करुन या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 च्या अधिनियमानुसार मोबदला अदा करणेबाबत मा. न्यायालयाचा निर्णय दि.24/08/2021 रोजी प्राप्त करुन घेतलेला आहे.

त्यानुसार विषयांकित जमिनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 सह भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013 (नवीन भूसंपादन अधिनियम-2013) या दोन्ही अधिनियमाअंतर्गत संपादीत करणे आवश्यक आहे.

भूमि संपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013(नवीन भूसंपादन अधिनियम-2013) या अधिनियमानुसार संपादन करणेसाठी जिल्हाधिकारी ठाणे यांना विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी ठाणे यांना भूमि संपादन करण्यासाठी महानगरपालिकेने सादर करावयाच्या प्रस्तावामध्ये भूमि संपादन करणेसाठी ठराव पारीत करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सदर प्रकरणी भूमि संपादन करणेस मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव सविनय सादर.

**(मा. आयुक्त तथा प्रशासक सो., यांचे मान्यतेने.)**

**( हे. रा. ठाकूर )**
**सहाय्यक संचालक, नगररचना**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. 04/10/2022 ३. २.४५
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद प्रशासकीय
रजिस्टर अ. क्र. 52 वर्ष : 2022-23

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## प्रशासकीय ठराव क्र. ४५ दि. ०६/१० /2022

**प्रकरण क्र. ४६ :-** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील मौजे-चेणे येथील सर्व्हे क्रमांक-2, 90, 91 व 148 या जमिनीमधील 7498.00 चौमी क्षेत्र **"नियोजीत 18.00 मी.रुंद रस्ता"** या सार्वजनिक प्रयोजनाकरीता "भूमि संपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013" (नवीन भूसंपादन अधिनियम-2013) अन्वये विकसित करणेकामी संपादन करणेबाबत.

## // कार्यालयीन प्रस्तावना //

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे-चेणे येथील विकास योजनेतील 12.00 मी. विकास योजना रस्त्यास नव्याने 18.00 मी. रुंदीकरण करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमचे कलम 37(1) मंजुरीनुसार मिळणेस शासनाकडे प्रस्ताव सादर केला असता सदर प्रस्तावास शासन निर्णय क्रमांक - टिपीएस-1220/786/प्रक्र.73/20/नवि-20 दि. 18 जानेवारी 2022 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(2) खालील तरतूदींनुसार शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे-चेणे येथील स.क्र. 2, 90, 91 व 148 या जमिनी 18.00 मी. रुंद रस्त्याने बाधीत होत असून सदर जमिनींचे 18.00 मी. रुंद रस्त्यासाठी" खाजगी वाटाघाटीने अथवा भूमि संपादन अधिनियमानुसार संपादन करुन ताब्यात घेणेबाबत संबंधितांस कळविण्यात आले होते. तथापि श्रीम. नेत्रा अजित विजयकर यांनी विषयांकित जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 व भूमि संपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013(नवीन भूसंपादन अधिनियम-2013) या अधिनियमानुसार सदर जमिनींचे भूसंपादन करणेबाबत श्रीम. नेत्रा अजित विजयकर, श्रीम. वरुणा श्रीकांत तांबे व श्रीम. अनिता रघुनाथ म्हापसेकर यांच्या एकत्रीत दि.08/06/2022 रोजीच्या विनंती अर्जाद्वारे लेखी विनंती केलेली आहे.

विषयांकित मौजे-चेणे येथील सर्व्हे क्र. 2, 90, 91 व 148 या जमिनींचे 7/12 उताऱ्यावरील भोगवटादार व सर्व्हे क्रमांक निहाय क्षेत्राबाबतची माहिती आणि संपादन करावयाच्या क्षेत्राची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | भोगवटादाराचे नाव | 7/12 उताऱ्या वरील क्षेत्र (चौ.मी.) | 18.00 मी. रुंद रस्त्याचे संपादन करावयाचे क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | श्रीम. नेत्रा अजित विजयकर | 7700 | 3085 |
| 2 | 90 | श्रीम. नेत्रा अजित विजयकर | 6880 | 2273 |
| 3 | 91 | श्रीम. नेत्रा अजित विजयकर | 26140 | 1130 |
| 4 | 148 | श्रीम.नेत्रा अजित विजयकर<br>श्रीम. वरुणा श्रीकांत तांबे<br>श्रीम.अनिता रघुनाथ म्हापसेकर | 3240 | 510 |
| | | | एकूण | 7498 चौ.मी. |

तथापि श्रीम. नेत्रा विजयकर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचीका क्र. 4447/2022 अन्वये याचीका दाखल करुन या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 च्या अधिनियमानुसार मोबदला अदा करणेबाबत मा. न्यायालयाचा निर्णय दि.24/08/2021 रोजी प्राप्त करुन घेतलेला आहे.

त्यानुसार विषयांकित जमिनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 सह भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013 (नवीन भूसंपादन अधिनियम-2013) या दोन्ही अधिनियमाअंतर्गत संपादीत करणे आवश्यक आहे.

भूमि संपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013(नवीन भूसंपादन अधिनियम-2013) या अधिनियमानुसार संपादन करणेसाठी जिल्हाधिकारी ठाणे यांना विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी ठाणे यांना भूमि संपादन करण्यासाठी महानगरपालिकेने सादर करावयाच्या प्रस्तावामध्ये भूमि संपादन करणेसाठी ठराव पारीत करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सदर प्रकरणी भूमि संपादन करणेस मान्यता मिळणेसाठीच्या प्रस्तावास प्रशासक यांची मंजुरी मिळणेस विनंती आहे. असा प्रस्ताव सादर केला आहे.

# प्रशासकीय ठराव क्र. ४५ दि. ०६/१० /2022

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत मिरा-भाईंदर महानगर पालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील मौजे-चेणे येथील सर्व्हे क्रमांक-2, 90, 91 व 148 या जमिनीमधील 7498.00 चौमी क्षेत्र **"नियोजीत 18.00 मी.रुंद रस्ता"** या सार्वजनिक प्रयोजनाकरीता "भूमि संपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013" (नवीन भूसंपादन अधिनियम-2013) अन्वये विकसित करणेकामी संपादन करणेबाबत आवश्यक ठराव करणेच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452(अ) च्या (1अ) व (1ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एम.सी.ओ.2020/प्रक्र.71(भाग-1)/नवि-14, दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार श्री. दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभेचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरून मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील मौजे-चेणे येथील सर्व्हे क्रमांक-2, 90, 91 व 148 या जमिनीमधील 7498.00 चौमी क्षेत्र **"नियोजीत 18.00 मी.रुंद रस्ता"** या सार्वजनिक प्रयोजनाकरीता "भूमि संपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013" (नवीन भूसंपादन अधिनियम-2013) अन्वये विकसित करणेकामी संपादनापोटी येणारा भूसंपादनाचा खर्च, त्याअनुषंगाने येणारा न्यायालयीन खर्च आणि शासकीय आस्थापना फी व इतर वाढीव खर्चास या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पद्धतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(दिलीप ढोले)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)**

**ता.जि.ठाणे**

**म. महासभा दि.06/10/2022**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रं.46 :- राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधण्यात आलेल्या व्यायामशाळेसाठी साहित्य् खरेदी करणेबाबत.**

राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेल्या व्यायामशाळेमध्ये महानगरपालिकेमार्फत साहित्य् पुरवठा करावयाचा असुन लेआऊट नुसार व्यायामशाळेसाठी खालीलप्रमाणे साहित्य् आवश्यक आहे.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | आवश्यक् नग |
|---|---|---|
| • | GYM FLOOR CARPET | PER SQ.FT. |
| | CARDIO | |
| 1 | TREADMILL | 02 |
| 2 | ELLIPTICAL | 01 |
| 3 | RECUMBENT BIKE | 01 |
| 4 | UPRIGHT BIKE | 01 |
| 5 | AIR ROWER | 01 |
| | STRENGTH | |
| 6 | PEC FLY/REAR DELT | 01 |
| 7 | LAT PULL DOWN | 01 |
| 8 | ASSISTED DIP CHIN | 01 |
| 9 | BICEPS CURL | 01 |
| 10 | WRIST CURL | 01 |
| 11 | LEG EXTENTION | 01 |
| 12 | PRONE LEG CURL | 01 |
| 13 | MULTI FUNCTIONAL STATION | 01 |
| 14 | DUAL AXIS FLAT BENCH | 01 |
| 15 | DUAL AXIS DECLINE BENCH | 01 |
| 16 | DUAL AXIS INCLINE BENCH | 01 |
| 17 | 45*LEG PRESS | 01 |
| 18 | SEATED CALF | 01 |
| 19 | SMITH MACHINE COUNTER BALANCED | 01 |
| 20 | SUPER BENCH | 03 |
| 21 | VERTICAL PLATE TREE | 01 |
| 22 | DUMBBELL RACK TWIN TIER | 01 |

वरीत तक्यात नमुद साहित्य् खरेदी करणेकामी अंदाजीत रु.50,00,000/- (अक्षरी- पन्नास लाख रुपये मात्र) खर्च अपेक्षित आहे. सन 2022-23 च्या अंदाजपत्रकातील क्रीडा विभागा अंतर्गत "महापौर चषक (पान क्रं.39)" या लेखाशिर्षा अंतर्गत 1 कोटी 50 लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. तरी व्यायामशाळेसाठी वरीत तक्यात नमुदप्रमाणे साहित्य् खरेदी करण्यासाठी प्रशासकीय ठराव करण्यास मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

29.9.22

(रवि पवार)
उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Backup 11-09-2017\Desktop\KRIDA VIBHAG\ghoshwara\ghoshwara\व्यायामशाळेसाठी साहित्य खरेदी करणेबाबत राष्ट्रीय महामार्ग 08 लगत तरण तलाव व व्यायामशाळा.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि.ठाणे

## क्रीडा विभाग

## प्रशासकिय सभा दि. ०८/१० /2022

**प्रकरण क्रं. ४७** :- **राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधण्यात आलेल्या व्यायामशाळेसाठी साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रशासकीय ठराव क्रं ४८ दिनांक :-** ०८/१०/२०२२

राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेल्या व्यायामशाळेमध्ये महानगरपालिकेमार्फत साहित्य् पुरवठा करावयाचा असुन लेआऊट नुसार व्यायामशाळेसाठी खालीलप्रमाणे साहित्य् आवश्यक आहे.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | आवश्यक् नग |
|---|---|---|
| • | GYM FLOOR CARPET | PER SQ.FT. |
| | CARDIO | |
| 1 | TREADMILL | 02 |
| 2 | ELLIPTICAL | 01 |
| 3 | RECUMBENT BIKE | 01 |
| 4 | UPRIGHT BIKE | 01 |
| 5 | AIR ROWER | 01 |
| | STRENGTH | |
| 6 | PEC FLY/REAR DELT | 01 |
| 7 | LAT PULL DOWN | 01 |
| 8 | ASSISTED DIP CHIN | 01 |
| 9 | BICEPS CURL | 01 |
| 10 | WRIST CURL | 01 |
| 11 | LEG EXTENTION | 01 |
| 12 | PRONE LEG CURL | 01 |
| 13 | MULTI FUNCTIONAL STATION | 01 |
| 14 | DUAL AXIS FLAT BENCH | 01 |
| 15 | DUAL AXIS DECLINE BENCH | 01 |
| 16 | DUAL AXIS INCLINE BENCH | 01 |
| 17 | 45*LEG PRESS | 01 |
| 18 | SEATED CALF | 01 |
| 19 | SMITH MACHINE COUNTER BALANCED | 01 |
| 20 | SUPER BENCH | 03 |
| 21 | VERTICAL PLATE TREE | 01 |
| 22 | DUMBBELL RACK TWIN TIER | 01 |

वरीत तक्यात नमुद साहित्य् खरेदी करणेकामी अंदाजीत रु.50,00,000/- (अक्षरी- पन्नास लाख रुपये मात्र) खर्च अपेक्षित आहे. सन 2022-23 च्या अंदाजपत्रकातील क्रीडा विभागा अंतर्गत "महापौर चषक (पान क्रं.39)" या लेखाशिर्षा अंतर्गत 1 कोटी 50 लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. तरी व्यायामशाळेसाठी वरीत तक्यात नमुदप्रमाणे साहित्य खरेदी करण्यासाठी रु.50,00,000/- होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता तसेच उपरोक्त् कामाची निविदा मागविण्यास या प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

## ता.जि.ठाणे

**सभा दि.०६/१० /2022**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रं.४८:- राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधण्यात आलेल्या व्यायामशाळेसाठी साहित्य् खरेदी करणेकामी तरतुदीचे पुर्नविनियोजन करणेबाबत**

राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेल्या व्यायामशाळेमध्ये महानगरपालिकेमार्फत साहित्य् पुरवठा करावयाचा असुन सदर साहित्य् खरेदी करणेकामी अंदाजीत रु.50,00,000/- (अक्षरी- पन्नास लाख रुपये मात्र) खर्च अपेक्षित आहे. सन 2022-23 च्या अंदाजपत्रकातील क्रीडा विभागा अंतर्गत "महापौर चषक (पान क्रं.39)" या लेखाशिर्षा अंतर्गत 1 कोटी 50 लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. तरी व्यायामशाळेसाठी वरीत तक्यात नमुदप्रमाणे साहित्य् खरेदी करणेकरीता "महापौर चषक" लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध तरतुदीचे पुर्नविनियोजन करणेकामी प्रशासकीय ठराव करण्यास मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(रवि पवार)
उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**
**भाईंदर (प.), ता.जि.ठाणे**

**क्रीडा विभाग**

**प्रशासकीय सभा दि.06/10 /2022**

**प्रकरण क्रं. 48** :- **राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधण्यात आलेल्या व्यायामशाळेसाठी साहित्य् खरेदी करणेकामी तरतुदीचे पुर्नविनियोजन करणेबाबत.**

**प्रशासकीय ठराव क्रं.** 40 **दिनांक :-** 06/10/2022

राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेल्या व्यायामशाळेमध्ये महानगरपालिकेमार्फत साहित्य् पुरवठा करावयाचा असुन सदर साहित्य खरेदी करणेकामी अंदाजीत रु.50,00,000/- (अक्षरी- पन्नास लाख रुपये मात्र) खर्च अपेक्षित आहे.

सन 2022-23 च्या अंदाजपत्रकातील क्रीडा विभागा अंतर्गत "महापौर चषक (पान क्रं.39)" या लेखाशिर्षा अंतर्गत 1 कोटी 50 लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. तरी व्यायामशाळेसाठी साहित्य खरेदी करणेकरीता "महापौर चषक" लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध तरतुद रु.150.00 लक्ष पैकी आवश्यक तरतुद रु.50.00 लक्ष तरतुदीचे पुर्नविनियोजन करणेकामी प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(दिलीप ढोले)**
**प्रशासक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

D:\Backup 11-09-2017\Desktop\KRIDA VIBHAG\tharav ghoshwara\tharav\व्यायामशाळेसाठी लागणारे साहित्य खरेदी करणेकामी तरतुदीचे पुर्नविनियोजन करणेबाबत.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

## ता.जि.ठाणे

सभा दि.०६/ १० /2022

// गोषवारा //

**प्रकरण क्रं.४८:- राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले तरण तलाव व व्यायामशाळा इमारत तसेच परिसर दैनंदिन संचलन, देखभाल दुरुस्तीसाठी धोरण निश्चित करणेबाबत.**

राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले तरण तलाव व व्यायामशाळा इमारत तसेच परिसर दैनंदिन संचलन, देखभाल दुरुस्तीसाठी धोरण निश्चित करावयाचे आहे. त्यानुसार जलतरण तलाव, व्यायामशाळा व स्केटींग यांची दरसुची खालीलप्रमाणे प्रस्तावित करीत आहे.

1) मनपा शाळा/खाजगी शाळा व संस्था यांचेकरीता स्पर्धा आयोजनाकरीता घ्यावयाचे दर

| अ.क्र. | तपशिल | दरपत्रक (रु.) |
|---|---|---|
| 1 | मनपा शाळा मधील विदयार्थी | विनामुल्य् |
| 2 | खाजगी शाळा इ. 12 वी पर्यंतचे विदयार्थी (प्रति खेळ प्रति दिन) | 9000 |
| 3 | वरिष्ठ् महाविदयालय (प्रति खेळ प्रति दिन) | 15000 |
| 4 | क्रीडा संघटना संस्था क्लब् कंपनी इतर (प्रति खेळ प्रति दिन) | 18750 |
| 5 | वरिष्ठ गटातील राज्य् राष्ट्रीय खेळाडू (प्रति खेळ प्रति दिन) | 18750 |

**2) जलतरण तलाव - दरपत्रक**

| अ. क्र. | तपशिल | दर प्रति दिन प्रति व्यक्ती | | | सहामाही मेंबरशिप | वार्षिक मेंबरशिप |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सोम. ते शुक्र. | शनि., रवि., व सुट्टीचे दिवस | मासिक दर | | |
| 1 | जलतरण | 100/- | 125/- | 1000/- | 3750/- | 6250/- |
| 2 | वरिष्ठ नागरीकांसाठी जलतरण | 50/- | 100/- | 500/- | 1500/- | 2500/- |

**3) व्यायाम शाळा - दरपत्रक**

| तपशिल | तिमाही दर रु. | सहामाही दर रु. | वार्षिक रु. |
|---|---|---|---|
| व्यायाम शाळा | 1875/- | 3750/- | 6250/- |

**4) स्केटींग - दरपत्रक**

| अ. क्र. | तपशिल | दर प्रति दिन प्रति व्यक्ती | | | सहामाही मेंबरशिप | वार्षिक मेंबरशिप |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सोम. ते शुक्र. | शनि., रवि., व सुट्टीचे दिवस | मासिक दर | | |
| 1 | स्केटींग | 75/- | 100/- | 500/- | 2500/- | 5000/- |

वरीलप्रमाणे दरसुची नुसार तरणतलाव व व्यायामशाळा संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी इतर अटीशर्ती खालीलप्रमाणे,

1. मिरा भाईंदर महानगरपालिकेले तरणतलाव व व्यायामशाळा करीता खेळनिहाय दरसुची निश्चित केल्याप्रमाणे निविदा धारकांने लाभार्थी कडुन घेणे बंधनकारक आहे.
2. महानगरपालिकेने तरणतलाव व व्यायामशाळा करीता निश्चित केलेली दरसुची दर्शनीय भागात लावणे निविदाधारकांस बंधनकारक असेल.
3. व्यायामशाळेसाठी लागणारे साहित्य् महानगरपालिकेमार्फत देण्यात येईल, परंतु त्यांची देखभाल व दुरुस्ती ही निविदाधारकास करणे बंधनकारक असेल.
4. निविदाधारकांने निविदेमधील फायनान्शीयल बीड मध्ये Royalty नमुद करताना कोणताही कर समाविष्ठ् न करता नमुद करावी.
5. Royalty वरील लागणारा कर शासनास भरावयसाची जबाबदारी निविदाधारकाची राहील, त्यास महानगरपालिका जबाबदारा राहणार नाही, याची स्पष्ट् नोंद घ्यावी.
6. राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले तरण तलाव व व्यायामशाळा इमारत अंतर्गत संरचनेत बदल करावयाचा असल्यास क्रीडा विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक असेल.
7. राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले तरण तलाव व व्यायामशाळा इमारतीमधील किरकोळ दुरुस्ती (उदा. स्विमिंग पुल, विजेची उपकरणे व इतर किरकोळ) निविदाधारकांने करणे बंधनकारक असले तसेच मोठया प्रमाणातील दुरुस्ती महानगरपालिका करेल (उदा. स्लॅपगळती, पत्राशेड तुटले असल्यास, भिंत पडल्यास, रंगकाम व इतर)
8. राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले तरण तलाव व व्यायामशाळा इमारत मध्ये इतर खेळ नव्याने सुरु करावयाचे असल्यास क्रीडा विभागाची लेखी पुर्वपरवागनी घेणे बंधनकारक राहील.
9. राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले तरण तलाव व व्यायामशाळा इमारत मध्ये प्रशिक्षण घेण्यास येणाऱ्या लाभार्थ्यांस वैयक्तिक प्रशिक्षक (PEROSNAL TRAINER) आवश्यक् असल्यास देण्यात यावा तसेच याकरीता लाभार्थ्यांकडुन घेण्यात येणारी फी क्रीड विभागाकडुन मंजुर करुन घेण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.
10. महानगरपालिकेच्या स्पर्धांकरीता तरण तलाव विनामुल्य् उपलब्ध् करुन देण्याची जबाबदारी निविदाधारकांची राहील.
11. मजुंर निविदाधारकाने जेवढी रक्कम् Royalty म्हणुन निविदेत नमुद करण्यात आलेली असेल तेवढीच रक्कम् बँक सुरक्षा अनामत रक्कम् म्हणुन महानगरपालिकेत जमा करणे आवश्यक् आहे.
12. सदर तरणतलाव व व्यायामशाळा संचलन व देखभालीसाठी स्वत:चे सुरक्षारक्षक, साफसफाई कर्मचारी नेमणे व त्यांचे वेतन किमान वेतन कायदयाप्रामणे अदा करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.
13. सदर तरणतलाव व व्यायामशाळेत काही दुर्घटना/आपत्ती/जिवितहानी झाल्यास त्याची जबाबदारी निविदाधारकांची असले, त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची स्पष्ट् नोंद घेण्यात यावी.
14. निविदा अंतिम झालेनंतर निविदेची कालावधी 5 वर्षाचा असले दरवर्षी लेखी मुदतवाढ करुन घेण्याची जबाबदारी निविदाधारकांची राहील.
15. तरण तलाव व व्यायामशाळेसाठी स्वच्छतेसाठी व इतर कामाकरीता लागणारा आवश्यक् खर्च निविदाधारकांस करावा लागेल.

16.निविदेमध्ये नमुद करण्यात आलेल्या Royalty रक्कमेमध्ये प्रति वर्षी 10% वाढ होईल आणि त्याप्रमाणे दरवर्षी सुरुवाती Royalty भरण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील, असे न झाल्यास 18% व्याजदराप्रमाणे दंड निविदाधारकाकडुन आकारण्यात येईल.

17.तरणतलाव तसेच व्यायामशाळेसाठी प्रशिक्षीत प्रशिक्षक व कर्मचारी नेमण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

18. तरणतलाव तसेच व्यायामशाळेचे विदयुत बिल, पाण्याचे बिल (देयक) मिटर रिडींग प्रमाणे भरण्याची जबाबदारी निविदाधारकांची राहील.

19. तरणतलाव व व्यायामशाळेसाठी नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदयानुसार वेतन अदा करण्याची जबाबदारी निविदाधारकांची राहील, तसेच त्यांचे वेतन/मानधन त्यांच्या बँक खात्यात जगा करण्यात येईल.

20. निविदाधारकाने महानगरपालिकेने तरणतलाव व व्यायामशाळेकरीता ठरविलेले दर खेळाडूकडुन आकारणे, महानगरपालिकेकडुन ठरविलेले मेंबरशिप फी घेणे व त्यांची नोंद नोंदवहीत ठेवणे इत्यादीचा समावेश असेल.

21. तरणतलाव परिसरात व व्यामशाळा परिसरात दारु, मादक द्रव्य् घेण्यास सक्त् मनाई आहे, असे आढळून आल्यास योग्य् ती पोलीस कारवाई संबंधितावर केली जाईल. अशा संस्था/क्लब/कंपनी/खेळाडुंना भविष्यात पुन्हा मैदान सरावासाठी दिले जाणार नाही.

22. विदयुत प्रकाश झोतात तरणतलाव स्पर्धा आयोजित करावयाच्या असल्यास विदयुत बिलाचा खर्च संबंधित आयोजकास करावा लागेल. याकरीता विदयुत अनामत रक्कम् महणुन रु.15000/- जगा करावे करावे लागतील. स्पर्धा संपल्यानंतर प्रत्यक्ष विदयुत खर्च वजा जाता उर्वरित अनामत रक्कम् परत करण्याची जबाबदारी सदर निविदाधारकाची राहील.

23. तरणतलाव येथे स्पर्धा आयोजन झाल्यानंतर तरणतलाव स्वच्छ करुन देण्याची जबाबदारी संबंधित आयोजकांवर बंधनकारक राहील. अन्यथा त्यांच्याकडुन स्वच्छतेच्या खर्चासह दंडात्मक् रक्कम् म्हणुन रु.5000/- वसुल करण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहील.

24. निविदाधारकाचे वर्तन खेळाडू/संस्था/मंडळ/कंपनी/क्रीडा संघटना यांच्यासोबत सहकार्याचे असणे अपेक्षित आहे.

25. स्थानिक शाळा/विदयालयातील विदयार्थ्यांकडे मैदानात येताना ओळखपत्र असणे बंधनकारक राहील. संबंधित प्राधिकृत ओळखपत्रा शिवाय मैदानात प्रवेश न देण्याची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील.

26. क्रीडा संकुल खेळा व्यतीरिक्त् इतर कार्यक्रमाकरीता म्हणजेच वाढदिवस, स्नेहमेळावा इ. कार्यक्रमाकरीता 100 ते 150 व्यक्तींच्या उपस्थितीसह उपलब्ध् करुन देण्याची जबाबदारी निविदाधारकांची राहील (मदयपान/धुम्रपानास मनाई राहील)

27. निविदाधारकांने तरणतलाव व व्यायामशाळा इमारतील मध्ये उपहार गृह सुरु करण्यापुर्वी क्रीडा विभागाकडुन खादयपदार्थ, शितपेये यांचे दर निश्चित करुन घेणे बंधनकारक राहील.

28. सदर तरणतलाव व व्यायामशाळा बाबत लेखा परिक्षण करतेवेळी उपस्थित होणाऱ्या लेखा आक्षेपांची जबाबदारी निविदाधारकांची राहील.

29. राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 वरील महानगरपालिकेने बांधलेल्या तरण तलाव व व्यायामशाळा इमारतीचा रोष दायित्व कालावधी (DLP) दोन वर्षाचा असुन सदर कालावधीत बांधकामाची दुरुस्ती ही बांधकाम विभागाच्या कंत्राटदारामार्फत करण्यात येईल. पुढील तीन वर्षाकरीता बांधकामाची दुरुस्ती निविदाधारकांमार्फत करण्याची जबाबदारी राहील.

30. सदर अटीशर्ती व्यतिरिक्त् निविदा अंतिम झालेनंतर करारनामाध्ये करण्यात येणाऱ्या अटीशर्ती मान्य् करणे निविदाधारकास बंधनकारक असेल.

31. निविदाधारकोन वरील अटीशर्तीचे पालन न केल्यास निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. उप-आयुक्त, क्रीडा विभाग यांना राहील तसेच निविदाधारकास सदरचा निर्णय मान्य नसल्यास व्दितीय अपिल मा. आयुक्त सो. यांच्याकडे करावे तद्नंतर मा. आयुक्त सो. यांचा निर्णय हा अंतिम राहील याची निविदाधारकाने नोंद घ्यावी.

तरी वरील अटी शर्तीप्रमाणे राष्ट्रीय महामार्ग 08 लगत तरण तलाव व व्यायामशाळा संचलन व देखभाल करणेकामी धोरण निश्चित करणेकरीता प्रशासकीय ठराव करण्यास मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(रवि पवार)
उप-आयुक्त
क्रीडा विभाग
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. ०४/१०/२०22 सायं. ४.४५ वा.
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. प्रशासकीय ५५ वर्ष :- 2022-23

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Backup 11-09-2017\Desktop\KRIDA VIBHAG\thatav ghoshwara\ghoshwara\धोरण निश्चित करणेबाबत राष्ट्रीय महामार्ग 08 लगत तरण तलाव व व्यायामशाळेचे.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि.ठाणे

## क्रीडा विभाग

**प्रशासकीय सभा दि.06/10 /2022**

**प्रकरण क्रं. ४९** **:- राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले तरण तलाव व व्यायामशाळा इमारत तसेच परिसर दैनंदिन संचलन, देखभाल दुरुस्तीसाठी धोरण निश्चित करणेबाबत.**

**प्रशासकीय ठराव क्रं. ४८ दिनांक :- 06/10/2022**

राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले तरण तलाव व व्यायामशाळा इमारत तसेच परिसर दैनंदिन संचलन, देखभाल दुरुस्तीसाठी धोरण निश्चित करावयाचे आहे. त्यानुसार जलतरण तलाव, व्यायामशाळा व स्केटींग यांची दरसुची खालीलप्रमाणे प्रस्तावित करीत आहे.

1) मनपा शाळा/खाजगी शाळा व संस्था यांचेकरीता स्पर्धा आयोजनाकरीता घ्यावयाचे दर

| अ.क्र. | तपशिल | दरपत्रक (रु.) |
|---|---|---|
| 1 | मनपा शाळा मधील विदयार्थी | विनामुल्य् |
| 2 | खाजगी शाळा इ. 12 वी पर्यंतचे विदयार्थी (प्रति खेळ प्रति दिन) | 9000 |
| 3 | वरिष्ठ् महाविदयालय (प्रति खेळ प्रति दिन) | 15000 |
| 4 | क्रीडा संघटना संस्था क्लब् कंपनी इतर (प्रति खेळ प्रति दिन) | 18750 |
| 5 | वरिष्ठ् गटातील राज्य् राष्ट्रीय खेळाडू (प्रति खेळ प्रति दिन) | 18750 |

**2) जलतरण तलाव - दरपत्रक**

| अ. क्र. | तपशिल | दर प्रति दिन प्रति व्यक्ती | | | सहामाही मेंबरशिप | वार्षिक मेंबरशिप |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सोम. ते शुक्र. | शनि., रवि., व सुट्टीचे दिवस | मासिक दर | | |
| 1 | जलतरण | 100/- | 125/- | 1000/- | 3750/- | 6250/- |
| 2 | वरिष्ठ नागरीकांसाठी जलतरण | 50/- | 100/- | 500/- | 1500/- | 2500/- |

**3) व्यायाम शाळा - दरपत्रक**

| तपशिल | तिमाही दर रु. | सहामाही दर रु. | वार्षिक रु. |
|---|---|---|---|
| व्यायाम शाळा | 1875/- | 3750/- | 6250/- |

**4) स्केटींग - दरपत्रक**

| अ. क्र. | तपशिल | दर प्रति दिन प्रति व्यक्ती | | | सहामाही मेंबरशिप | वार्षिक मेंबरशिप |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सोम. ते शुक्र. | शनि., रवि., व सुट्टीचे दिवस | मासिक दर | | |
| 1 | स्केटींग | 75/- | 100/- | 500/- | 2500/- | 5000/- |

वरीलप्रमाणे दरसुची नुसार तरणतलाव व व्यायामशाळा संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी इतर अटीशर्ती खालीलप्रमाणे,

1. मिरा भाईंदर महानगरपालिकेले तरणतलाव व व्यायामशाळा करीता खेळनिहाय दरसुची निश्चित केल्याप्रमाणे निविदा धारकांने लाभार्थी कडुन घेणे बंधनकारक आहे.
2. महानगरपालिकेने तरणतलाव व व्यायामशाळा करीता निश्चित केलेली दरसुची दर्शनीय भागात लावणे निविदाधारकांस बंधनकारक असेल.
3. व्यायामशाळेसाठी लागणारे साहित्य् महानगरपालिकेमार्फत देण्यात येईल, परंतु त्यांची देखभाल व दुरुस्ती ही निविदाधारकास करणे बंधनकारक असेल.
4. निविदाधारकांने निविदेमधील फायनान्शीयल बीड मध्ये Royalty नमुद करताना कोणताही कर समाविष्ठ् न करता नमुद करावी.
5. Royalty वरील लागणारा कर शासनास भरावयसाची जबाबदारी निविदाधारकाची राहील, त्यास महानगरपालिका जबाबदारा राहणार नाही, याची स्पष्ट् नोंद घ्यावी.
6. राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले तरण तलाव व व्यायामशाळा इमारत अंतर्गत संरचनेत बदल करावयाचा असल्यास क्रीडा विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक असेल.
7. राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले तरण तलाव व व्यायामशाळा इमारतीमधील किरकोळ दुरुस्ती (उदा. स्विमिंग पुल, विजेची उपकरणे व इतर किरकोळ) निविदाधारकांने करणे बंधनकारक असले तसेच मोठया प्रमाणातील दुरुस्ती महानगरपालिका करेल (उदा. स्लॅपगळती, पत्राशेड तुटले असल्यास, भिंत पडल्यास, रंगकाम व इतर)
8. राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले तरण तलाव व व्यायामशाळा इमारत मध्ये इतर खेळ नव्याने सुरु करावयाचे असल्यास क्रीडा विभागाची लेखी पुर्वपरवागनी घेणे बंधनकारक राहील.
9. राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले तरण तलाव व व्यायामशाळा इमारत मध्ये प्रशिक्षण घेण्यास येणाऱ्या लाभार्थ्यांस वैयक्तिक प्रशिक्षक (PEROSNAL TRAINER) आवश्यक् असल्यास देण्यात यावा तसेच याकरीता लाभार्थ्यांकडुन घेण्यात येणारी फी क्रीड विभागाकडुन मंजुर करुन घेण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.
10. महानगरपालिकेच्या स्पर्धाकरीता तरण तलाव विनामुल्य् उपलब्ध् करुन देण्याची जबाबदारी निविदाधारकांची राहील.
11. मजुंर निविदाधारकाने जेवढी रक्कम् Royalty म्हणुन निविदेत नमुद करण्यात आलेली असेल तेवढीच रक्कम् बँक सुरक्षा अनामत रक्कम् म्हणुन महानगरपालिकेत जमा करणे आवश्यक् आहे.
12. सदर तरणतलाव व व्यायामशाळा संचलन व देखभालीसाठी स्वत्:चे सुरक्षारक्षक, साफसफाई कर्मचारी नेमणे व त्यांचे वेतन किमान वेतन कायदयाप्रामणे अदा करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.
13. सदर तरणतलाव व व्यायामशाळेत काही दुर्घटना/आपत्ती/जिवितहानी झाल्यास त्याची जबाबदारी निविदाधारकांची असले, त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची स्पष्ट् नोंद घेण्यात यावी.
14. निविदा अंतिम झालेनंतर निविदेची कालावधी 5 वर्षाचा असले दरवर्षी लेखी मुदतवाढ करुन घेण्याची जबाबदारी निविदाधारकांची राहील.
15. तरण तलाव व व्यायामशाळेसाठी स्वच्छतेसाठी व इतर कामाकरीता लागणारा आवश्यक् खर्च निविदाधारकांस करावा लागेल.

16. निविदेमध्ये नमुद करण्यात आलेल्या Royalty रक्कमेमध्ये प्रति वर्षी 10% वाढ होईल आणि त्याप्रमाणे दरवर्षी सुरुवाती Royalty भरण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील, असे न झाल्यास 18% व्याजदराप्रमाणे दंड निविदाधारकाकडुन आकारण्यात येईल.
17. तरणतलाव तसेच व्यायामशाळेसाठी प्रशिक्षीत प्रशिक्षक व कर्मचारी नेमण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.
18. तरणतलाव तसेच व्यायामशाळेचे विदयुत बिल, पाण्याचे बिल (देयक) मिटर रिडींग प्रमाणे भरण्याची जबाबदारी निविदाधारकांची राहील.
19. तरणतलाव व व्यायामशाळेसाठी नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदयानुसार वेतन अदा करण्याची जबाबदारी निविदाधारकांची राहील, तसेच त्यांचे वेतन/मानधन त्यांच्या बँक खात्यात जगा करण्यात येईल.
20. निविदाधारकाने महानगरपालिकेने तरणतलाव व व्यायामशाळेकरीता ठरविलेले दर खेळाडूकडुन आकारणे, महानगरपालिकेकडुन ठरविलेले मेंबरशिप फी घेणे व त्यांची नोंद नोंदवहीत ठेवणे इत्यादीचा समावेश असेल.
21. तरणतलाव परिसरात व व्यामशाळा परिसरात दारु, मादक द्रव्य् घेण्यास सक्त् मनाई आहे, असे आढळून आल्यास योग्य् ती पोलीस कारवाई संबंधितावर केली जाईल. अशा संस्था/क्लब्/कंपनी/खेळाडुंना भविष्यात पुन्हा मैदान सरावासाठी दिले जाणार नाही.
22. विदयुत प्रकाश झोतात तरणतलाव स्पर्धा आयोजित करावयाच्या असल्यास विदयुत बिलाचा खर्च संबंधित आयोजकास करावा लागेल. याकरीता विदयुत अनामत रक्कम् महणुन रु.15000/- जगा करावे करावे लागतील. स्पर्धा् संपल्यानंतर प्रत्यक्ष विदयुत खर्च वजा जाता उर्वरित अनामत रक्कम् परत करण्याची जबाबदारी सदर निविदाधारकाची राहील.
23. तरणतलाव येथे स्पर्धा् आयोजन झाल्यानंतर तरणतलाव स्वच्छ् करुन देण्याची जबाबदारी संबंधित आयोजकांवर बंधनकारक राहील. अन्यथा त्यांच्याकडुन स्वच्छतेच्या खर्चासह दंडात्मक् रक्कम् म्हणुन रु.5000/- वसुल करण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहील.
24. निविदाधारकाचे वर्तन खेळाडू/संस्था/मंडळ/कंपनी/क्रीडा संघटना यांच्यासोबत सहकार्याचे असणे अपेक्षित आहे.
25. स्थानिक शाळा/विदयालयातील विदयार्थ्यांकडे मैदानात येताना ओळखपत्र असणे बंधनकारक राहील. संबंधित प्राधिकृत ओळखपत्रा शिवाय मैदानात प्रवेश न देण्याची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील.
26. क्रीडा संकुल खेळा व्यतीरिक्त् इतर कार्यक्रमाकरीता म्हणजेच वाढदिवस, स्नेहमेळावा इ. कार्यक्रमाकरीता 100 ते 150 व्यक्तींच्या उपस्थितीसह उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी निविदाधारकांची राहील (मदयपान/धुम्रपानास मनाई राहील)
27. निविदाधारकांने तरणतलाव व व्यायामशाळा इमारतील मध्ये उपहार गृह सुरु करण्यापुर्वी क्रीडा विभागाकडुन खादयपदार्थ, शितपेये यांचे दर निश्चित करुन घेणे बंधनकारक राहील.
28. सदर तरणतलाव व व्यायामशाळा बाबत लेखा परिक्षण करतेवेळी उपस्थित होणाऱ्या लेखा आक्षेपांची जबाबदारी निविदाधारकांची राहील.
29. राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 वरील महानगरपालिकेने बांधलेल्या तरण तलाव व व्यायामशाळा इमारतीचा रोष दायित्व कालावधी (DLP) दोन वर्षाचा असुन सदर कालावधीत बांधकामाची दुरुस्ती ही बांधकाम विभागाच्या कंत्राटदारामार्फत करण्यात येईल. पुढील तीन वर्षाकरीता बांधकामाची दुरुस्ती निविदाधारकांमार्फत करण्याची जबाबदारी राहील.
30. सदर अटीशर्ती व्यतिरिक्त् निविदा अंतिम झालेनंतर करारनामाध्ये करण्यात येणाऱ्या अटीशर्ती मान्य् करणे निविदाधारकास बंधनकारक असेल.

31. निविदाधारकोन वरील अटीशर्तीचे पालन न केल्यास निविदा रद्द करण्याचा अधिकारे मा. उप-आयुक्त, क्रीडा विभाग यांना राहील तसेच निविदाधारकास सदरचा निर्णय मान्य नसल्यास व्दितीय अपिल मा. आयुक्त सो. यांच्याकडे करावे तद्नंतर मा. आयुक्त सो. यांचा निर्णय हा अंतिम राहील याची निविदाधारकाने नोंद घ्यावी.

तरी वरील अटी शर्तीप्रमाणे राष्ट्रीय महामार्ग 08 लगत तरण तलाव व व्यायामशाळा संचलन व देखभाल करणेकामी धोरण निश्चित करणेकरीता प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

## // गोषवारा //

सभा/दि. ६/१०/२०२२

**प्रकरण क्र. (५०) :-** मिरा भाईंदर शहराच्या प्रारुप विकास योजनेमध्ये मौजे-घोडबंदर येथील सर्व्हे क्रमांक 148/2, 133/7, 133/8 133/6 व 132/3; स.क्र.127/4पै., 5पै., 133/1पै., 2, 3पै., 4पै., 5पै., 6पै., 7पै., 8पै., 134/2 134/3पै., 135/3पै., 148/1पै., 2पै.; स.क्र.129/11,12,13; 130/1,6,15,; 132/1,2,4,5,6,8,9,10; 148/3,5 या जमिनीच्या 13500.00 चौ.मी. क्षेत्रावर महानगरपालिकेच्या प्रयोजनार्थ (Municipal Purpose) या कारणासाठी जागा आरक्षीत करणेबाबत / राखीव ठेवणेबाबत.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) हि दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून ती दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना ही दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून ती दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे एकूण क्षेत्र 79.40 चौ.कि.मी. इतके आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मुख्यालय, आज रोजी भाईंदर (प.) या ठिकाणी असून सदरची इमारत ही तळ + 4 मजल्याची आहे. आज रोजी मिरा भाईंदर शहराची लोकसंख्या सुमारे 13.00 लक्ष ते 15.00 लक्ष च्या आसपास आहे. तसेच भविष्यात ही लोकसंख्या वाढत जाणार असल्यामुळे त्या लोकसंख्येच्या प्रमाणात नागरिकांना सोईसुविधा उपलब्ध करुन देणेची आवश्यकता भासणार आहे. त्यासाठी अधिकारी कर्मचाऱ्यांची संख्या सुध्दा वाढणार आहे. तसेच महानगरपालिकेच्या काही विभागामध्ये ही वाढ आणि नगरसेवकांची संख्याही वाढणार आहे. ही बाब विचारात घेता सध्याची इमारत अपुरी पडणार आहे.

यापूर्वी सन 2015 मध्ये मिरारोड (पूर्व) येथील एस. के. स्टोन या ठिकाणी महानगरपालिकेसाठी प्रशासकीय इमारतीचे भूमीपूजन करण्यात आलेले होते. परंतु सदर ठिकाणच्या जागेच्या मालकी हक्काबाबत वाद निर्माण झाल्यामुळे व त्याबाबत कोणताही निर्णय न झाल्यामुळे अदयापपर्यंत सदरच्या इमारतीचे काम सुरु होऊ शकले नाही. त्यामुळे सद्यस्थितीत शहराची वाढलेली लोकसंख्या, त्यानुसार वाढणारी नगरसेवकांची संख्या तसेच नागरिकांना दयावा लागणाऱ्या सोई सुविधा त्यासाठी आवश्यक अधिकारी व कर्मचारी वर्गासाठी भविष्याच्या दृष्टीकोनातुन प्रशस्त अशी प्रशासकीय इमारत बांधणे अत्यंत आवश्यक आहे.

सद्यस्थितीत प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी कोणतीही मोठया क्षेत्राची बांधकाम योग्य अशी जागा आजमितीस नागरी सुविधा क्षेत्र किंवा आरक्षण स्वरुपात महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर येथील मे. जे.पी. इन्फ्रा रियल्टी प्रा.लि. यांच्या मिरा भाईंदर महानगरपालिकेने मंजूर केलेल्या पत्र क्र. मनपा/नर/3855/2021-22 दि.11/02/2022 अन्वयेच्या रेखांकनामध्ये मौजे-घोडबंदर येथील स.क्र.148/2, 133/7, 133/8 133/6 व 132/3 या जमिनीच्या एकूण क्षेत्र 3150.37 चौ.मी. क्षेत्रावर "नागरी सुविधा क्षेत्र" या कारणाकरीता भुखंड महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेला आहे.

तसेच सदरच्या नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडास लागुनच मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील (आरक्षण क्र.325 "बगीचा" (Garden)) च्या क्षेत्राचा स.क्र.127/4पै., 5पै., 133/1पै., 2, 3पै., 4पै., 5पै., 6पै., 7पै., 8पै., 134/2 134/3पै., 135/3पै., 148/1पै., 2पै. या जमिनीवरील समावेश आरक्षणाच्या माध्यमातून (Accomodation Reservation Policy) क्षेत्र 4549.40 चौ.मी. स्थानबदल (Relocation) केलेला असून सदरच्या जागा हया 18.00 मी. रुंद व 60.00 मी. रुंद विकसित विकास योजना रस्त्यास सन्मुख आहेत.

सदरच्या 18.00 मी. रुंद व 60.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यास लागून काही खाजगी मालकीचे क्षेत्र आहे. सदरचे खाजगी मालकीचे क्षेत्र आणि महानगरपालिकेस नागरी सुविधा क्षेत्राचा हस्तांतरीत केलेला भूखंड व बगीचा यांचे क्षेत्र जर एकत्रित केल्यास ते सुमारे अंदाजे 13500 चौ.मी. इतके उपलब्ध होवू शकते. त्यानुसार या एकत्रित क्षेत्राची म्हणजेच, नागरी सुविधा क्षेत्र, खाजगी मालकीचे क्षेत्र व आरक्षण क्र. 325 "बगीचा" चे क्षेत्र यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सदरच्या खाजगी जागेचे नागरी सुविधा क्षेत्र भुखंडाचे व आरक्षण क्र.325 "बगीचा" खालील जागेचे

| तपशिल / आरक्षण | सर्व्हे क्रमांक | क्षेत्र |
|---|---|---|
| **नागरी सुविधा क्षेत्र** | स.क्र.148/2, 133/7, 133/8 133/6 व 132/3 | 3150.37 चौ.मी. |
| **आरक्षण क्र. 325 (बगीचा)** | स.क्र.127/4पै., 5पै., 133/1पै., 2, 3पै., 4पै., 5पै., 6पै., 7पै., 8पै., 134/2 134/3पै., 135/3पै., 148/1पै., 2पै. | 4549.40 चौ.मी. |
| **खाजगी क्षेत्र** | स.क्र.129/11,12,13; 130/1,6,15,; 132/1,2,4,5,6,8,9,10; 148/3,5 | अंदाजे 5800 चौ.मी. |

मौजे-घोडबंदर येथील नागरी सुविधा क्षेत्राचा भुखंड व त्यास लागुन स्थलांतरीत (Relocation) केलेले आरक्षण क्र.325 "बगीचा" चे क्षेत्र आणि काही खाजगी मालकीचे क्षेत्र मिळून असे एकत्रित सुमारे अंदाजे 13500 चौ.मी. क्षेत्राचा बांधकाम योग्य असा भुखंड महानगरपालिकेसाठी उपलब्ध होईल. तसेच सदरचा भुखंड हा मिरा भाईंदर शहराच्या प्रवेश मार्गाजवळ म्हणजेच मुंबई- अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गापासून जवळच्या अंतरावर उपलब्ध होईल.

सदरची जागा शहराच्या प्रवेशव्दाराजवळ असून 18.00 मी. रुंद व 60.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यास लागून आहे. त्यामुळे सदर ठिकाणी प्रशस्त अशा प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे शक्य होईल. सदरचे क्षेत्र हे सद्यस्थितीत मिरा भाईंदर शहरासाठी प्रारुप विकास योजना तयार करण्याचे काम सुरु असून मौजे घोडबंदर येथील सुमारे अंदाजे 13500 चौ.मी. क्षेत्राचा एकत्रित भुखंड हा प्रारुप विकास योजनेमध्ये महानगरपालिका प्रयोजनार्थ "Municipal Purpose" साठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये आरक्षीत केल्यास सदर ठिकाणी एकत्रित व बांधकाम योग्य असा भुखंड उपलब्ध होईल व सदर ठिकाणी प्रशस्त अशी मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रशासकीय इमारत उभी करणे शक्य होईल.

तरी सदरचा एकत्रित भुखंड मिरा भाईंदर शहराच्या प्रारुप विकास योजनेमध्ये महानगरपालिका प्रयोजनार्थ "Municipal Purpose" साठी आरक्षित करणेसाठी तसेच सदरच्या मंजूरीनुसार निर्गमित करावयाचा ठराव हा या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) नुसार प्राप्त होणाऱ्या हरकत / सुचना शासनास सादर करावयाच्या पुढील सर्व कार्यवाही अतंर्गत कायम राहील. त्याअनुषंगाने सदर प्रकरणी ठराव मान्यतेसाठी प्रस्ताव सविनय सादर.

**(मा. आयुक्त तथा प्रशासक सो., यांचे मान्यतेने.)**

( हे. रा. ठाकूर )
**सहाय्यक संचालक, नगररचना**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकीय ठराव क्र. ४९ दि. ०६/१०/2022

प्रकरण क्र. ५० :- मिरा भाईंदर शहराच्या प्रारुप विकास योजनेमध्ये मौजे-घोडबंदर येथील सर्व्हे क्रमांक 148/2, 133/7, 133/8 133/6 व 132/3; स.क्र.127/4पै., 5पै., 133/1पै., 2, 3पै., 4पै., 5पै., 6पै., 7पै., 8पै., 134/2 134/3पै., 135/3पै., 148/1पै., 2पै.; स.क्र.129/11,12,13; 130/1,6,15,; 132/1,2,4,5,6,8,9,10; 148/3,5 या जमिनीच्या 13500.00 चौ.मी. क्षेत्रावर महानगरपालिकेच्या प्रयोजनार्थ (Municipal Purpose) या कारणासाठी जागा आरक्षीत करणेबाबत / राखीव ठेवणेबाबत

**// कार्यालयीन प्रस्तावना //**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) हि दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून ती दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना ही दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून ती दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे एकूण क्षेत्र 79.40 चौ.कि.मी. इतके आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मुख्यालय, आज रोजी भाईंदर (प.) या ठिकाणी असून सदरची इमारत ही तळ + 4 मजल्याची आहे. आज रोजी मिरा भाईंदर शहराची लोकसंख्या सुमारे 13.00 लक्ष ते 15.00 लक्ष च्या आसपास आहे. तसेच भविष्यात ही लोकसंख्या वाढत जाणार असल्यामुळे त्या लोकसंख्येच्या प्रमाणात नागरिकांना सोईसुविधा उपलब्ध करुन देणेची आवश्यकता भासणार आहे. त्यासाठी अधिकारी कर्मचाऱ्यांची संख्या सुध्दा वाढणार आहे. तसेच महानगरपालिकेच्या काही विभागामध्ये ही वाढ आणि नगरसेवकांची संख्याही वाढणार आहे. ही बाब विचारात घेता सध्याची इमारत अपुरी पडणार आहे.

यापूर्वी सन 2015 मध्ये मिरारोड (पूर्व) येथील एस. के. स्टोन या ठिकाणी महानगरपालिकेसाठी प्रशासकीय इमारतीचे भूमीपूजन करण्यात आलेले होते. परंतु सदर ठिकाणच्या जागेच्या मालकी हक्काबाबत वाद निर्माण झाल्यामुळे व त्याबाबत कोणताही निर्णय न झाल्यामुळे अदयापपर्यंत सदरच्या इमारतीचे काम सुरु होऊ शकले नाही. त्यामुळे सद्यस्थितीत शहराची वाढलेली लोकसंख्या, त्यानुसार वाढणारी नगरसेवकांची संख्या तसेच नागरिकांना दयावा लागणाऱ्या सोई सुविधा त्यासाठी आवश्यक अधिकारी व कर्मचारी वर्गासाठी भविष्याच्या दृष्टीकोनातुन प्रशस्त अशी प्रशासकीय इमारत बांधणे अत्यंत आवश्यक आहे.

सद्यस्थितीत प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी कोणतीही मोठया क्षेत्राची बांधकाम योग्य अशी जागा आजमितीस नागरी सुविधा क्षेत्र किंवा आरक्षण स्वरुपात महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही.

# प्रशासकीय ठराव क्र. ८९ दि. ६/१० /2022

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर येथील मे. जे.पी. इन्फ्रा रियल्टी प्रा.लि. यांच्या मिरा भाईंदर महानगरपालिकेने मंजूर केलेल्या पत्र क्र. मनपा/नर/3855/2021-22 दि.11/02/2022 अन्वयेच्या रेखांकनामध्ये मौजे-घोडबंदर येथील स.क्र.148/2, 133/7, 133/8 133/6 व 132/3 या जमिनीच्या एकूण क्षेत्र 3150.37 चौ.मी. क्षेत्रावर "नागरी सुविधा क्षेत्र" या कारणाकरीता भुखंड महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेला आहे.

तसेच सदरच्या नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडास लागुनच मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील (आरक्षण क्र.325 "बगीचा" (Garden)) च्या क्षेत्राचा स.क्र.127/4पै., 5पै., 133/1पै., 2, 3पै., 4पै., 5पै., 6पै., 7पै., 8पै., 134/2 134/3पै., 135/3पै., 148/1पै., 2पै. या जमिनीवरील समावेश आरक्षणाच्या माध्यमातून (Accomodation Reservation Policy) क्षेत्र 4549.40 चौ.मी. स्थानबदल (Relocation) केलेला असून त्याची मालकी ही महानगरपालिकेची आहे. सदरच्या जागा हया 18.00 मी. रुंद व 60.00 मी. रुंद विकसित विकास योजना रस्त्यास सन्मुख आहेत.

सदरच्या 18.00 मी. रुंद व 60.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यास लागून काही खाजगी मालकीचे क्षेत्र आहे. सदरचे खाजगी मालकीचे क्षेत्र आणि महानगरपालिकेस नागरी सुविधा क्षेत्राचा हस्तांतरीत केलेला भूखंड व बगीचा यांचे क्षेत्र जर एकत्रित केल्यास ते सुमारे अंदाजे 13500 चौ.मी. इतके उपलब्ध होवू शकते. त्यानुसार या एकत्रित क्षेत्राची म्हणजेच, नागरी सुविधा क्षेत्र, खाजगी मालकीचे क्षेत्र व आरक्षण क्र. 325 "बगीचा" चे क्षेत्र यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सदरच्या खाजगी जागेचे नागरी सुविधा क्षेत्र भुखंडाचे व आरक्षण क्र.325 "बगीचा" खालील जागेचे

| तपशिल / आरक्षण | सर्व्हे क्रमांक | क्षेत्र |
|---|---|---|
| नागरी सुविधा क्षेत्र | स.क्र.148/2, 133/7, 133/8 133/6 व 132/3 | 3150.37 चौ.मी. |
| आरक्षण क्र. 325 (बगीचा) | स.क्र.127/4पै., 5पै., 133/1पै., 2, 3पै., 4पै., 5पै., 6पै., 7पै., 8पै., 134/2 134/3पै., 135/3पै., 148/1पै., 2पै. | 4549.40 चौ.मी. |
| खाजगी क्षेत्र | स.क्र.129/11,12,13; 130/1,6,15,; 132/1,2,4,5,6,8,9,10; 148/3,5 | अंदाजे 5800 चौ.मी. |

मौजे-घोडबंदर येथील नागरी सुविधा क्षेत्राचा भुखंड व त्यास लागुन स्थलांतरीत (Relocation) केलेले आरक्षण क्र.325 "बगीचा" चे क्षेत्र आणि काही खाजगी मालकीचे क्षेत्र मिळून असे एकत्रित सुमारे अंदाजे 13500 चौ.मी. क्षेत्राचा बांधकाम योग्य असा भुखंड महानगरपालिकेसाठी उपलब्ध होईल.

# प्रशासकीय ठराव क्र. ४८ दि. ६/१० /2022

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत मिरा भाईंदर शहराच्या प्रारुप विकास योजनेमध्ये मौजे-घोडबंदर येथील सर्व्हे क्रमांक 148/2, 133/7, 133/8 133/6 व 132/3; स.क्र.127/4पै., 5पै., 133/1पै., 2, 3पै., 4पै., 5पै., 6पै., 7पै., 8पै., 134/2 134/3पै., 135/3पै., 148/1पै., 2पै.; स.क्र.129/11,12,13; 130/1,6,15,; 132/1,2,4,5,6,8,9,10; 148/3,5 या जमिनीच्या 13500.00 चौ.मी. क्षेत्रावर महानगरपालिकेच्या प्रयोजनार्थ (Municipal Purpose) या कारणासाठी जागा आरक्षीत करणेबाबत / राखीव ठेवणेबाबत आवश्यक ठराव करणेच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452(अ) च्या (1अ) व (1ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एम.सी.ओ.2020/प्रक्र.71(भाग-1)/नवि-14, दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार श्री. दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभेचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरून मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील मौजे-घोडबंदर येथील सर्व्हे क्रमांक 148/2, 133/7, 133/8 133/6 व 132/3; स.क्र.127/4पै., 5पै., 133/1पै., 2, 3पै., 4पै., 5पै., 6पै., 7पै., 8पै., 134/2 134/3पै., 135/3पै., 148/1पै., 2पै.; स.क्र.129/11,12,13; 130/1,6,15,; 132/1,2,4,5,6,8,9,10; 148/3,5 या जमिनीच्या 13500.00 चौ.मी. क्षेत्रावर महानगरपालिकेच्या प्रयोजनार्थ (Municipal Purpose) या कारणासाठी जागा आरक्षीत करणेबाबत / राखीव ठेवणेकामी तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) नुसार प्राप्त होणाऱ्या हरकत / सुचना शासनास सादर करावयाच्या पुढील सर्व कार्यवाहीसाठी या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पद्धतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // बांधकाम विभाग //

## // गोषवारा //

४९ सभा दि. ६/१०/2022

**प्रकरण क्रमांक :-** भाईंदर पश्चिम स्व.कल्पना चावला अग्निशमन केंद्र जवळील आजारी पशुपक्षी उपचार केंद्रा ऐवजी भाईंदर पश्चिम उड्डाणुलाखालील जागेत स्थलांतरीत करुन बांधणेस मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर पश्चिम स्व.कल्पना चावला अग्निशमन केंद्राजवळील मोकळया जागेत जखमी आजारी पशुपक्षी यांचेवर उपचार करण्यासाठी शेड बांधणे कामास मा. विशेष महासभा दि.26/07/2018 ठराव क्र.42 अन्वये मान्यता प्राप्त आहे. सदर कामाकरीता ई-निविदा प्रक्रीया करुन कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आलेले आहेत. तथापी सदर प्रस्तावित जागेत पशु-पक्षी उपचार केंद्र बांधल्यास अग्निशमन विभागास त्यांचे कडे मोठया प्रमाणावर वाहने असल्याने जागा मोकळी सोडणे आवश्यक असल्याने वाहने अवागमनास व पार्क करणेस अडथळा निर्माण होणार असल्याने सदर ठिकाणी उचार केंद्र बांधणे योग्य होणार नाही असे मा.उपआयुक्त (अग्निशमन) यांनी कळविल्यामुळे सदर उपचार केद्रांची जागा स्थलांतरीत करण्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि.24/08/2022 रोजी मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. तरी सदर आजारी पशुपक्षी उपचार केंद्राची मुळ जागा बदलुन सदर उपचार केंद्र भाईंदर पश्चिम उड्डाणपुलाखाली (आय.डी.बी.आय. बँके समोरील व विरंगुळा केंद्रासमोरील जागेत) बांधणेसाठी मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
प्र.शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

PC-6/CP/22-23/DK/Adesh-6

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक 0 सप्टेंबर 2022 रोजी सकाळी ११:०१ वाजता.

---

**विषय क्र. (४९) :-** मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

भाईंदर पश्चिम स्व.कल्पना चावला अग्निशमन केंद्र जवळील आजारी पशुपक्षी उपचार केंद्रा ऐवजी भाईंदर पश्चिम उड्डाणुलाखालील जागेत स्थलांतरीत करुन बांधणेस मान्यता देणे.

## कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर पश्चिम स्व.कल्पना चावला अग्निशमन केंद्राजवळील मोकळया जागेत जखमी आजारी पशुपक्षी यांचेवर उपचार करण्यासाठी शेड बांधणे कामास मा. विशेष महासभा दि.26/07/2018 ठराव क्र.42 अन्वये मान्यता प्राप्त आहे. सदर कामाकरीता ई-निविदा प्रक्रीया करुन कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आलेले आहेत. तथापी सदर प्रस्तावित जागेत पशु-पक्षी उपचार केंद्र बांधल्यास अग्निशमन विभागास त्यांचे कडे मोठया प्रमाणावर वाहने असल्याने जागा मोकळी सोडणे आवश्यक असल्याने वाहने अवागमनास व पार्क करणेस अडथळा निर्माण होणार असल्याने सदर ठिकाणी उचार केंद्र बांधणे योग्य होणार नाही असे मा.उपआयुक्त (अग्निशमन) यांनी कळविल्यामुळे सदर उपचार केद्रांची जागा स्थलांतरीत करण्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि.24/08/2022 रोजी मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. तरी सदर आजारी पशुपक्षी उपचार केंद्राची मुळ जागा बदलुन सदर उपचार केंद्र भाईंदर पश्चिम उड्डाणपुलाखाली (आय.डी.बी.आय. बँके समोरील व विरंगुळा केंद्रासमोरील जागेत) बांधणेसाठी मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

## प्रशासकीय ठराव क्र. ५० दिनांक ०६/09/2022

भाईंदर पश्चिम स्व.कल्पना चावला अग्निशमन केंद्र जवळील आजारी पशुपक्षी उपचार केंद्रा ऐवजी भाईंदर पश्चिम उड्डाणुलाखालील जागेत स्थलांतरीत करुन बांधणेस मान्यता देणे कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार जागा बदलून पशुपक्षी उपचार केंद्र बांधणेस प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(दिलीप ढोले)**
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

PC-6/22-23/DK/SG - 1.2

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

## // गोषवारा //

स्थाप्ता दि. 6/10/2022

**प्रकरण क्रमांक** (५२) :- भाईंदर पश्चिम सुभाषचंद्र बोस मैदान चित्रपटाच्या शुटींग करीता भाड्याने देणेबाबत

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर पश्चिम येथे शहराच्या मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र.91 क्रिडा संकुलासाठी राखीव आहे. सदर मैदानाचा खेळण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापर होत असतो. मा. स्थायी समिती सभा दि.24/09/2009, ठराव क्र.54 अन्वये सदर मैदान भाड्याने देण्यासाठी भाडे दर व धोरण / अटीशर्ती निश्चित करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे सुधारीत भाडेदर दि.26/02/2018, ठराव क्र.90 अन्वये ठरविण्यात आले आहेत. सदर मैदान विविध खेळ, क्रिडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम (शाळा/ कॉलेज स्नेहसंमेलन) या साठीच भाड्याने देण्याबाबत धोरण आहे.

सदर मैदान नामांकित चित्रपट निर्देशक तथा चित्रपट निर्माते श्री. राजकुमार हिरानी यांनी त्यांच्या डुंकी या श्री. शाहरुख खान हे मुख्य कलाकार असलेल्या चित्रपटाच्या शुटींगसाठी दि.18 ऑक्टोंबर 2022 ते दि.22 ऑक्टोंबर 2022 या कालावधीत भाड्याने उपलब्ध करुन देण्यासाठी दि.01/10/2022 रोजीच्या पत्रान्वये परवानगी मागितलेली आहे. सदर मैदानात फक्त दि.20 ऑक्टोंबर 2022 व 21 ऑक्टोंबर 2022 रोजी प्रत्यक्ष शुटींग होणार असून तत्पूर्वी दोन दिवस सदर शुटींग करीता रेस ट्रॅक, स्टेज, प्रेक्षक स्टॅन्ड, निवेदक स्टेज व त्या अनुशांगिक तात्पुरते स्ट्रक्चर उभारण्यासाठी लागणार असून दि.22 ऑक्टोंबर 2022 रोजी सर्व साहित्य सामुग्री हटविण्यासाठी लागणार आहे.

सदर शुटींगसाठी परवानगी मागणारी मे. आर.एच.एफ. या संस्थेमार्फत शुटींगचे काम पूर्ण झाल्यावर सदर मैदान पुर्ववत करुन देण्यात येणार आहे. त्यासाठी उद्यान विभाग कामावेळी समक्ष उपस्थित राहून देखरेख करेल.

वरील वस्तुस्थिती पहाता एक खास बाब म्हणून उद्यान विभागाच्या अटीशर्तीनुसार सदर मैदान शुटींगसाठी यापूर्वी ठरविलेल्या दराने भाड्याने देणेबाबत प्रशासकीय ठरावाद्वारे निर्णस होणेस शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**कार्यकारी अभियंता (मिळकत)**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-10/DK/2022-23/SG-1

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक ०६ ऑक्टोंबर 2022 रोजी सकाळी ११..१० वाजता.

**विषय क्र. (५२) :-** मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

भाईंदर पश्चिम सुभाषचंद्र बोस मैदान चित्रपटाच्या शुटींग करीता भाड्याने देणेबाबत

## कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर पश्चिम येथे शहराच्या मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र.91 क्रिडा संकुलासाठी राखीव आहे. सदर मैदानाचा खेळण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापर होत असतो.मा. स्थायी समिती सभा दि.24/09/2009, ठराव क्र.54 अन्वये सदर मैदान भाड्याने देण्यासाठी भाडे दर व धोरण / अटीशर्ती निश्चित करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे सुधारीत भाडेदर दि.26/02/2018, ठराव क्र.90 अन्वये ठरविण्यात आले आहेत. सदर मैदान विविध खेळ, क्रिडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम (शाळा/ कॉलेज स्नेहसंमेलन) या साठीच भाड्याने देण्याबाबत धोरण आहे.

सदर मैदान नामांकित चित्रपट निर्देशक तथा चित्रपट निर्माते श्री. राजकुमार हिरानी यांनी त्यांच्या डुंकी या श्री. शाहरुख खान हे मुख्य कलाकार असलेल्या चित्रपटाच्या शुटींगसाठी दि.18 ऑक्टोंबर 2022 ते दि.22 ऑक्टोंबर 2022 या कालावधीत भाड्याने उपलब्ध करुन देण्यासाठी दि.01/10/2022 रोजीच्या पत्रान्वये परवानगी मागितलेली आहे. सदर मैदानात फक्तदि.20 ऑक्टोंबर 2022 व 21 ऑक्टोंबर 2022 रोजी प्रत्यक्ष शुटींग होणार असून तत्पूर्वी दोन दिवस सदर शुटींग करीता रेस ट्रॅक, स्टेज, प्रेक्षक स्टॅन्ड, निवेदक स्टेज व त्या अनुशांगिक तात्पुरते स्ट्रक्चर उभारण्यासाठी लागणार असून दि.22 ऑक्टोंबर 2022 रोजी सर्व साहित्य सामुग्री हटविण्यासाठी लागणार आहे.

सदर शुटींगसाठी परवानगी मागणारी मे. आर.एच.एफ. या संस्थेमार्फत शुटींगचे काम पूर्ण झाल्यावर सदर मैदान पुर्ववत करुन देण्यात येणार आहे. त्यासाठी उद्यान विभाग कामावेळी समक्ष उपस्थित राहून देखरेख करेल.

वरील प्रस्ताव एक खास बाब म्हणून उद्यान विभागाच्या अटीशर्तीनुसार सदर मैदान शुटींगसाठी यापूर्वी ठरविलेल्या दराने भाड्याने देणेबाबत प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

## प्रशासकीय ठराव क्र. ५१ दिनांक ०६/१०/२०२२

भाईंदर पश्चिम सुभाषचंद्र बोस मैदान चित्रपटाच्या शुटींग करीता भाड्याने देणे कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानुसार भाईंदर पश्चिम सुभाषचंद्र बोस मैदान चित्रपटाच्या शुटींग करीता एक बाब म्हणुन दि.18 ऑक्टोंबर 2022 ते दि. 22 ऑक्टोंबर 2022 पर्यंत अटीशर्तीवर भाड्याने देणेकरीता प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देत आहे

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // मिळकत विभाग //

## // गोषवारा //

सभा दि. ६/१०/२०२१

**प्रकरण क्रमांक.** ( ५३ ) - मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भूखंड विकसित करण्यासाठभ् भाडेतत्वावर वितरीत करणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील शैक्षणिक प्रयोजनासाठी मोठया स्वरुपात भुखंड असुन सद्यस्थितीत 50% पेक्षा जास्त अथवा 2000 चौ.मीटर पेक्षा जास्त जागा ताब्यात आलेल्या भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान

| आरक्षणाची माहिती प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | आरक्षण क्र. | प्रयोजन | स.क्र./हि.क्र. | गाव | अंदाजे क्षेत्र (चौ.मी.) | मनपाच्या ताब्यात घेतेले एकुण क्षेत्र (चौ.मी.) | वार्षिक भाडे रक्कम | विक्रीसाठी किमंत |
| 1. | 110 | प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | 71 पै, 73 पै, 74 पै | खारी | 5000 | 1940 | 4310565 | 86211300 |
| 2. | 220 | प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | नवघर-190 पै, गोडदेव-34 पै, 33 पै | नवघर, गोडदेव | 5800 | 5723.85 | 7704302 | 154086042 |
| 3. | 255 | प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | 17 पै, 59 पै, 172 पै, 177 पै | नवघर | 4700 | 3431 | 5137923 | 102758450 |
| 4. | 260 | प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | 61 पै, 62 पै, 65 पै | गोडदेव | 4700 | 5070.65 | 9530210 | 190604205 |
| 5. | 321 | प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | 121 पै, 122 पै, 138 पै, 139 पै | घोडबंदर | 5600 | 2994.44 | 4147299 | 82945988 |
| 6. | 331 | प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | 35 पै, 51 पै | मिरा | 5000 | 3428.24 | 4919524 | 98390488 |

माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान

| आरक्षणाची माहिती माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | आरक्षण क्र. | प्रयोजन | स.क्र./हि.क्र. | गाव | अंदाजे क्षेत्र (चौ.मी.) | मनपाच्या ताब्यात घेतेले एकुण क्षेत्र (चौ.मी.) | वार्षिक भाडे रक्कम | विक्रीसाठी किमंत |
| 1. | 219 | माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान | 34 पै, 36 पै, 38 पै, 39 पै, 46 पै | गोडदेव | 11200 | 8150.13 | 13569966 | 271399329 |
| 2. | 228 | माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान | 33 पै, 34 पै, 186 पै | नवघर | 10100 | 2186 | 2942356 | 58847120 |
| 3. | 319 | माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान | 108पै, 121पै | घोडबंदर | 11000 | 10581.02 | 14654713 | 293094254 |
| 4. | 334 | माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान | 14पै, 15पै, 16पै, 33पै | मिरा | 13000 | 3967.6 | 5693506 | 113870120 |

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सदर शैक्षणिक भुखंड विकसित करणे करीता वेळोवेळी धोरण निश्चित केलेली आहेत. तथापी सदर धोरण महानगरपालिका अधिनियमाशी शासनाकडील आदेशांशी सुसंगत नसल्याने मा.महासभा दि.02/05/2018 ठराव क्र.12 मधील धोरणातील काही बाबी विखंडीत करण्यासाठी शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मंजुर विकास योजनेतील विकास हक्क प्रमाणपत्राच्या माध्यमातुन महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या भुखंडावर अतिक्रमणे होत असतात. सदर आरक्षणापैकी या पुर्वी विकसित झालेले तसेच महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळ विभागास भविष्यात मनपा मार्फत शाळा सुरु करणे साठी आवश्यक असलेले भुखंड वगळुन इतर भुखंडाबाबत फेर धोरण निश्चित करुन सदर शैक्षणिक प्रयोजनासाठी असलेली आरक्षणे विकसित करण्याची आवश्यकता आहे.

दि.2 सप्टेबंर 2022 रोजी मा.आयुक्त महोदय यांच्या समक्ष सहाय्यक संचालक, नगररचना, शहर अभियंता यांची सदर आरक्षणे विकसित करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या धर्तीवर धोरण निश्चित करण्याबाबत चर्चा झाली. सदर धोरणाच्या अनुशंगाने मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेतील 50% पेक्षा जास्त ताब्यात आलेल्या आरक्षणाच्या जागा 30 वर्ष मुदतीसाठी विकसित करण्यासाठी भाडेपट्टीने खाजगी शैक्षणिक संस्थाना शाळा बांधणेसाठी उपलब्ध करुन दिल्यास सदर आरक्षणाचा विकास होऊन शहरात अधिकची शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार आहे.

नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण-2017/प्र.क्र. 127/नवि-20 दिनांक 25 मे 2018 नुसार खालील प्रमाणे कार्यपध्दतीचे पालन करण्यास आदेशित केले आहे.

1) संबधित मालमत्ता भाडेतत्वावर / कायमस्वरुपी देताना तसेच त्याचा विकास करताना याबाबतची कार्यवाही ई-निविदा/ई-लिलाव प्रक्रीया राबवुन देण्यात यावी.
2) अधिनियमातील तरतुदीनुसार भाडे पट्टयाने जमिन देताना / कायम स्वरुपी देताना याकरीता आकारावयाच्या मोबदल्याची रक्कम कोणत्याही परिस्थितीत बाजार मुल्यापेक्षा कमी असता कामा नये.
3) स्थावर मालमत्ता भाडयाने देताना/कायमस्वरुपी देताना/विकसित करताना ज्या प्रयोजनार्थ संबंधित जमिन आरक्षित आहे. त्याच प्रयोजनार्थ जमिन देण्यात यावी.
4) स्थावर मालमत्ता उपरोक्त प्रमाणे भाडयाने देताना / कायमस्वरुपी देताना/विकसित करताना यासंबंधीचा करारनामा करताना नागरी स्थानिक संस्थेचे हित पुर्ण पणे जोपासले जाईल याची दक्षता घेण्यात यावी.
5) स्थावर मालमत्ता ज्या प्रयोजनार्थ देण्यात आल्या आहेत त्याच प्रयोजनार्थ त्याचा वापर होत आहे. याबाबत संबंधित नागरी संस्थानी नियमित पणे आढावा घ्यावा.
6) विहित अटी व शर्तीचे उल्लघन झाल्यास संबधित मालमत्ता महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात येईल. अशा स्वरुपाची अट करारनाम्यात अंतर्भुत करण्यात यावी.

7) स्थावर मालमत्ता ज्या अटी व शर्तीवर देण्यात आल्या आहेत त्या अटी व शर्तीचा भंग होत असल्यास / झाला असल्यास करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

8) उपरोक्त मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित आयुक्त, महानगरपालिका यांची राहिल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 अन्वये महानगरपालिकेच्या मालमत्तेचा विनियांग करण्यासंबधी तरतुदी विहित केल्या आहेत.

1) सदर तरतुदीतील कलम 79 (क) नुसार आयुक्तास महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, विकता येईल, भाडयाने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येईल.

2) कलम 79 (ड) मध्ये जो मोबदला घेऊन, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्टयाने देता येईल किंवा अन्यथा हस्तातंर करता येईल तो मोबदला, असे अधिमुल्य भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालु बाजार किंमती पेक्षा कमी असता कामा नये.

3) कलम 79 (ग) मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 79 मध्ये काहीही अंर्तभुत असले तरी आयुक्तास महानगरपालिकेच्या मंजुरीने व राज्य शासनाच्या मान्यतेने महाराष्ट्र गलिच्छ वस्ती (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम 1971 च्या तरतुदी अन्वये गलिच्छ वस्ती म्हणुन घोषित करण्यात आलेली, महानगरपालिकेच्या मालकीची जमीन, गलिच्छ वस्तीतील रहिवाशांच्या सहकारी संस्थेला किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही विकास योजनांच्या अंमलबजावणीच्या परिणामी बेघर झालेल्या व्यक्तींना किंवा महानगरपालिकेच्या विकास योजनेच्या अंमलबजावणीच्या परिणामी बेघर झालेल्या व्यक्तींनाच केवळ निर्माण केलेल्या गृहनिर्माण सहकारी संस्थेला किंवा महाराष्ट्र शासनाच्या किंवा भारत सरकारच्या कोणत्याही विभागास किंवा उपक्रमास, **किंवा सार्वजनिक प्रयोजनांसाठी किंवा वैदयकीय आणी शैक्षणिक प्रयोजनांसाठी केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 (1950 चा मुंबई 29) अन्वये नोंदणी केलेल्या सार्वजनिक न्यासला, किंवा संस्था नोंदणी अधिनियम 1860 (1860 चा 21) अन्वये किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 (1960 चा महा. 24) अन्वये नोंदणी असलेल्या संस्थेस किंवा कंपनी अधिनियम, 1956 (1956 चा 1) अन्वये नोंदणी केलेल्या कंपनीस किंवा व्यक्तीस सार्वजनिक शौचालये, मुताऱ्या आणि तत्सम सुविधांची तरतुद करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा विष्ठा, किंवा इतर घाण किंवा कचऱ्यावर प्रक्रीया करण्याकरीता संयत्रे उभारण्यासाठी अशा रितीने भाडेट्टीने देण्याकरीता नियम असलेल्या कमाल भाडयाच्या बाजार मुल्यापेक्षा किंवा इतर मोबदल्यापेक्षा कमी असेल अशा भाडयाने व महानगरपालिका लादील अशा शर्तीस अधीन राहुन, तीस वर्षापेक्षा अधिक होणार नाही इतक्या मुदती करीता भाडेपट्टयाने देण्यात येईल.**

वरील वस्तुस्थिती पहाता सदर शैक्षणिक भूखंडाची महानगरपालिकांच्या शाळांकरीता सद्यस्थितीत आवश्यकता असल्याचे दिसून येत नाही. तथापी सदर भुखंड सद्यस्थितीत बाजार भावानूसार भाडे तत्वावर शासनाने विहीत केलेल्या अटीशर्तीनूसार ई-निविदा / ई लिलाव पध्दतीने निविदा प्रक्रीया करून दिल्यास महानगरपालिकेस भाड्याने उत्पन्न मिळू शकेल व आरक्षणे देखिल विकसित होऊ शकती तरी सदर आरक्षणे चालू बाजारभावानूसार भाडे तत्वावर देण्यासाठी प्रशासकीय ठरावाव्दारे निर्णय होणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
कार्यकारी अभियंता (मिळकत)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-6/2022-23/DK/MG-6

गोषवारा प्राप्त दि. ०६/१०/२०२२
मा. प्रशासकीय गोषवारा नोंद
रजिस्टर प्र.क्र. ६० वर्ष: 2022/23

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका